सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, २२ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २३८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# पंतप्रधान मोदी गयाना आणि डॉमिनिकाच्या सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गयानाचा 'ऑर्डर ऑफ एक्सलन्स', तसेच डॉमिनिकाचा 'डॉमिनिका अवॉर्ड ऑफ ऑनर' या दोन सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. पंतप्रधान मोदी गयाना आणि डॉमिनिका या दोन देशांच्या दौऱ्यावर होते.





गयानाच्या संसद सभागृहात आयोजित एका समारंभात गयानाचे अध्यक्ष डॉ. मोहम्मद इरफान अली यांनी पंतप्रधान मोदी यांचा 'ऑर्डर ऑफ एक्सलन्स' या सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरव केला. दूरदर्शी राजकीय नेतृत्व, जागतिक स्तरावर विकसनशील देशांच्या अधिकारांचा पुरस्कार, जागतिक समुदायाची असामान्य सेवा आणि भारत-गयाना संबंधांना बळकटी देण्याची वचनबद्धता याबद्दल पंतप्रधानांचा बहुमान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना पंतप्रधान मोदींनी तो भारताच्या जनतेला आणि दोन्ही देशांमध्ये अतिशय खोलवर रुजलेल्या ऐतिहासिक संबंधांना समर्पित केला. आपला सरकारी दौरा म्हणजे भारत-गयाना मैत्रीला दृढ करण्याच्या दिशेने भारताच्या सातत्यपूर्ण बांधिलकीचा दाखला आहे, यावर त्यांनी भर दिला. गयानाचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त करणारे पंतप्रधान मोदी हे जगातील केवळ चौथे परदेशी नेते आहेत.

दरम्यान कॉमनवेल्थ ऑफ डॉमिनिकाच्या राष्ट्रपती सिल्व्हानी बर्टन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना डॉमिनिकाचा सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान डॉमिनिका अवॉर्ड ऑफ ऑनर प्रदान केला. हा सन्मान त्यांच्या उत्कृष्ट नेतृत्वासाठी, कोविड-१९ महामारीच्या काळात डॉमिनिकाला केलेल्या मदतीसाठी आणि भारत-डॉमिनिका संबंध बळकट करण्याच्या त्यांच्या कटिबद्धतेसाठी दिला गेला. डॉमिनिकाचे पंतप्रधान रूझवेल्ट स्केरिट या कार्यक्रमाला उपस्थित होते. पंतप्रधानांनी हा सन्मान भारतातील जनतेला आणि भारत व डॉमिनिकामधील ऐतिहासिक व सांस्कृतिक संबंधांना समर्पित केला. तसेच, भारत आणि डॉमिनिकामधील द्विपक्षीय संबंध भविष्यात अधिक मजबूत होतील, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्रात मतदान वाढले; महायुतीचेच सरकार बनणार : फडणवीस

मुंबई, २१ नोव्हेंबर : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत यंदा ६५.११ टक्के मतदानाची नोंद झाली असून, गेल्या ३० वर्षांतील ही सर्वाधिक मतदान टक्केवारी आहे. विशेषत: अखेरच्या काही तासांत मतदानाचा वेग वाढल्याने हा आकडा गाठला गेला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया देत महायुतीला या वाढलेल्या मतदानाचा फायदा होण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात मतदानाचा टक्का वाढला आहे, आणि इतिहास सांगतो की जेव्हा मतदान वाढते, तेव्हा भाजप आणि मित्र पक्षांना फायदा होतो. यंदा महिलांच्या मतदानाची टक्केवारीही वाढल्याचं समोर आलं आहे. यामागे 'लाडकी बहीण' योजनेचा मोठा वाटा असू शकतो. यामुळे महायुतीला निश्चितच लाभ होईल आणि महाराष्ट्रात आमचं सरकार स्थापन होईल, असा मला विश्वास आहे. लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी राज्यात मतदान टक्केवारी लक्षणीयरीत्या वाढली आहे. फडणवीस यांनी याला सरकारविषयी जनतेला वाटणाऱ्या आपुलकीशी जोडले. मतदान वाढण्याचा अर्थ नागरिकांना सध्याच्या सरकारबद्दल विश्वास वाटतोय. हा प्रो-इन्कम्बन्सी फॅक्टर देखील असू शकतो, असं ते म्हणाले. निकालाबाबत बोलताना त्यांनी सांगितलं की २३ तारखेला निकाल जाहीर झाल्यानंतर महायुतीतील तिन्ही पक्ष चांगला निर्णय घेतील. त्याचवेळी त्यांनी एक्झिट पोल्सवर प्रतिक्रिया देणं टाळलं. राज्यातील ही वाढलेली मतदानाची टक्केवारी बदलाचा संकेत देत असल्याचं निरीक्षण अनेक राजकीय तज्ज्ञांनी नोंदवलं आहे. फडणवीस यांनी मात्र हा वाढलेला टक्का महायुतीच्या पारड्यात जात असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

# अदानी समूहाने फेटाळून लावले सर्व आरोप

### अमेरिकेत अदानींनी कथित लाच दिल्याचे प्रकरण

मुंबई, २१ नोव्हेंबर : अदानी उद्योग समूहावर अमेरिकेत कथित लाच दिल्याचा तसेच फसवणूक केल्याचा र आरोप करण्यात आला आहे. अमेरिकेत झालेल्या या आरोपांनंतर आदानी उद्योग समूहाच्या सर्वच कंपन्यांचे शेअर्स गडगडले आहेत. यातील ४ कंपन्यांना तर थेट लोअर सर्किट लागले आहे. दरम्यान, अमेरिकेत करण्यात आलेले सर्व आरोप अदानी उद्योग समूहाने फेटाळले आहेत.

अदानी समूहाने अमेरिकेच्या डिपार्टमेंट ऑफ जस्टिस आणि यूएस सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज कमिशनने केलेले आरोप फेटाळले आहेत. अदानी ग्रीनच्या संचालकांवर केलेले आरोप निराधार असल्याचे अदानी उद्योग समूहाने म्हटले आहे. अभियोगातील आरोप हे आरोप आहेत आणि प्रतिवादी दोषी सिद्ध होईपर्यंत निर्दोष मानले जात असल्याचे अदानी समूहाने म्हटले आहे. आम्ही सर्व ते शक्य कायदेशीर मार्ग शोधू असे अदानी उद्योग समूहाने म्हंटले आहे. आमच्या उद्योग समूहात प्रशासनात नेमहीच उच्च दर्जा राखला जातो. तसेच पारदर्शकता, कायद्याचे पालन, सर्वोच्च मानकांचे पालन केले जाते. आम्ही त्यासाठी प्रतिबद्ध आहोत. आम्ही कायद्याचे पालन करणारे आहोत, असं आम्ही आमच्या स्टेकहोल्डर्स, पार्टनर्स तसेच कर्मचाऱ्यांना आश्वस्त करतो. आम्ही सर्व कायद्यांचे पालन करतो, असंही अदानी उद्योग समूहाच्या प्रवक्त्यांनी सांगितले.

भारतातील सर्वांत मोठा सौरउर्जी निर्मिती प्रकल्पाचे कंत्राट मिळावे यासाठी गौतम अदानी आणि त्यांचा पुतण्या सागर अदानी यांनी भारतीय अधिकाऱ्यांना सुमारे २५० दशलक्ष डॉलर्स देण्याचे मान्य केले होते. या प्रकल्पातून पुढच्या २० वर्षांत साधारण २ अब्ज डॉलर्सचा नफा मिळणार होता. तसेच कर्जदार आणि गुंतवणूकदार यांच्यापासून हा भ्रष्टाचार लपवून गौतम अदानी आणि अदानी ग्रीन एनर्जीचे सीईओ विनीत जैन यांनी ३ अब्ज डॉलर्स किमतिचे बॉण्ड्स आणि रोखे जमा केले होते, असाही आरोप करण्यात आला आहे.

# मुख्यमंत्र्यांची हुतात्मा स्मारकाला भेट

मुंबई, २१ नोव्हेंबर : 'महाराष्ट्र राज्य हुतात्मा स्मृती दिना'निमित्त आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील हुतात्मा स्मारकाला भेट देऊन शहीद हुतात्म्यांच्या स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर आणि मुंबई उपनगरांचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर हेदेखील यावेळी उपस्थित होते.

# अदानी समूहावर अमेरिकेत लाचखोरीचा आरोप

मुंबई, २१ नोव्हेंबर : अमेरिकेतील न्यूयॉर्क फेडरल कोर्टाने अदानी समूहाचे प्रमुख गौतम अदानी, त्यांचा पुतण्या सागर अदानी आणि अन्य सहा जणांवर अब्जावधी डॉलर्सच्या फसवणुकीसह लाचखोरीचे गंभीर आरोप ठेवले आहेत. या प्रकरणात भारतातील सौर ऊर्जा प्रकल्प मिळवण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना तब्बल २,११० कोटी रुपये (२५० दशलक्ष डॉलर्स) लाच दिल्याचा आरोप आहे.

सागर अदानी हे २०१५ मध्ये ब्राउन युनिव्हर्सिटीमधून अर्थशास्त्र पदवी घेतल्यानंतर अदानी समूहात सामील झाले. त्यांनी समूहाचा ऊर्जा विभाग आणि विशेषतः अदानी ग्रीन एनर्जीचे सौर व पवन ऊर्जा पोर्टफोलिओ तयार करण्याची जबाबदारी पार पाडली आहे. २०३० पर्यंत जगातील सर्वात मोठे अक्षय ऊर्जा पार्क उभारण्याच्या उद्दिष्टावर सागर अदानी काम करत आहेत. फेडरल कोर्टातील तक्रारीनुसार, गौतम अदानी व सागर अदानी यांनी अन्य आरोपींसह भारतातील सरकारी अधिकाऱ्यांना सौर ऊर्जा प्रकल्पांचे कंत्राट मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लाच दिली. यासोबतच गुंतवणूकदारांची दिशाभूल करत अब्जावधींचा निधी जमा केल्याचा आरोप आहे.

यामध्ये अमेरिकेतील एमईसी अधिकाऱ्यांनी चौकशी सुरू केली असून प्रकल्पासाठी लाच दिली गेली का, याचा शोध घेतला जात आहे. या प्रकरणामुळे अदानी समूहाच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. विशेषतः अदानी ग्रीन एनर्जीच्या सौर प्रकल्पांसाठी दिलेल्या लाचेचे आरोप भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठी धक्कादायक ठरले आहेत. अदानी समूहाने अद्याप यावर औपचारिक प्रतिक्रिया दिलेली नाही. या गंभीर आरोपांमुळे अदानी समूहाला मोठ्या आंतरराष्ट्रीय कायदेशीर आव्हानांचा सामना करावा लागणार आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संवेदनशीलता जपणारी पुणे भेट

पुणे : १२ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी पुणे येथे विधानसभा निवडणूकीच्या प्रचारासाठी आले होत.आयोजित केलेल्या सभेनंतर त्यांनी पंधरा मिनिटे पाच जणांसाठी राखून ठेवली होती हे विशेष उल्लेखनीय आहे.महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिती,पुणेचे अध्यक्ष जयराम फगरे ,वय वर्ष ९४,यांच्या हस्ते सन्मानपत्र स्वीकारले . फगरे यांनी हे चांदीचे सन्मान चिन्ह मागेच मोदीजींना देण्यासाठी तयार करून ठेवले होते .नरेंद्र मोदी हिंदी भाषेचे दूत आहेत कारण ते सर्वत्र हिंदीतून संवाद साधतात. म्हणून फगरे यांना त्यांचा सत्कार करायची फार इच्छा होती. हा योग १२ नोव्हेंबरच्या मोदीच्या दौऱ्यात आला.



एकता मासिकाच्या संपादिका रुपाली भुसारी यांनी सप्टेंबरच्या अंकात फगरे यांच्या कार्य विषयक आणि मोदीजींना भेटण्याची त्यांची इच्छा याविषयी प्रसिद्ध केला होता. हा लेख पुणे नगर वाचन मंदिरचे अध्यक्ष मधुमिलींद मेहेंदळे यांनी लिहीला होता.सन्मान चिन्हाचा मजकूर आकाशवाणीचे डॉ सुनिल देवधर यांनी तयार केला होता.याविषयी खा. मेधा कुलकर्णी यांना रुपाली भुसारी आणि सुनील देवधर यांनी माहिती कळवली होती.

त्यांच्या मदतीने या सगळ्यांची भेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह ठरवली गेली. त्यात पंधरा मिनिटे पंतप्रधानांसह संवाद साधण्याचे भाग्य यांना लाभले .

पुणेरी पगडी ,शाल, सन्मान चिन्ह फगरे यांनी त्यांना दिले . देवधरांनी पुस्तके दिली.तर भुसारी यांनी एकताचा दिवाळी अंक मोदींना दिला.नरेंद्र मोदी यांनी एकता मासिक खूप जूने असल्याचे आपल्या स्मरणात आहे असे सांगितले.तसेच एकता मासिकाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जेष्ठ असणाऱ्या फगरे यांची इच्छापूर्ती झाली.खा. मेधा कुलकर्णी यांनी जनतेच्या भावना विचारात घेऊन कार्याचा वसा चालू ठेवलेला आहे .

# गौतम आदानींना अटक करा- राहुल गांधी

नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर : कथित सौरऊर्जा कंत्राट लाच प्रकरणी उद्योगपती गौतम अदानी आणि इतरांवर अमेरिकेतील कोर्टात आरोप निश्चित करण्यात आले आहेत. यावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गौतम अदानी यांच्या अटकेची मागणी केली आहे. दिल्तीच्या काँग्रेस कार्यालयात आज, गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेत राहुल बोलत होते.

याप्रकरणी राहुल म्हणाले की, हा मुद्दा संसदेत मांडणार आहे. विरोधी पक्षनेता म्हणून हा मुद्दा मांडण्याची जबाबदारी माझी आहे. या प्रकरणी संयुक्त संसदीय समितीकडून (जेपीसी) चौकशीची गरज असून गौतम अदानींना अटक केली जावी असे गांधी म्हणाले. परंतु, पंतप्रधान मोदी यांचे अदानींना संरक्षण मिळत असल्यामुळे अदानींना भारतात अटक होणार नसल्याचा टोला देखील राहुल यांनी लगावला. अदानीने भारतीय आणि अमेरिकन कायदा दोन्ही मोडल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्यावर अमेरिकेत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मला आश्चर्य वाटते की अदानी या देशात मुक्तपणे कसे काय फिरू शकतात. अदानीने उघडपणे २ हजार कोटींचा घोटाळा केला आहे. कदाचित इतरही अनेक घोटाळे केले आहेत, पण ते राजरोसपणे फिरत आहे. पंतप्रधान अदानींना संरक्षण देत आहेत आणि पंतप्रधान अदानीसोबत भ्रष्टाचारात गुंतलेले आहेत, असाही आरोप राहुल गांधींनी केला.

# सीबीएसई बोर्डाकडून १0वी-१२वीचे वेळापत्रक जारी!

### १५ फेब्रुवारी २०२५ पासून सुरु होणार परीक्षा

मुंबई : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने २०२५ च्या इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. याबाबतचे सीबीएसईच्या अधिकृत वेबसाइटवर वेळापत्रक जारी केले आहे. त्यानुसार यंदा १०वी व १२वी सीबीएससी बोर्डाच्या परीक्षा एकाच दिवशी सुरु होणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ फेब्रुवारी २०२५ पासून १०वी-१२वी सीबीएससी बोर्डाच्या परीक्षा होणार आहेत. १०वीच्या परीक्षा १५ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत होणार आहेत. तर बारावीच्या परीक्षा ४ एप्रिलला संपणार आहेत.



सीबीएसईने सांगितले की, विद्यार्थ्यांने निवडलेल्या कोणत्याही २ परीक्षा एकाच तारखेला होणार नाहीत याची खात्री करण्यासाठी ४० हजारांहून जास्त विषयांचे संयोजन टाळून तारीख पत्रक तयार केले गेले आहे. सीबीएसईने परीक्षा सुरू होण्याच्या सुमारे ८६ दिवस आधी वेळापत्रक जाहीर करण्याची ही पहिलीच वेळ आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा २३ दिवस आधीच वेळापत्रक जारी करण्यात आले आहे.

# जम्मू-काश्मिरात एनआयएची छापेमारी!

जम्मू : राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) आज दहशतवादी घुसखोरी प्रकरणी जम्मू-काश्मीरमध्ये धाडी टाकल्यात. यावेळी एनआयएने निमलष्करी दल आणि पोलिसांच्या मदतीने राज्यात एकाच वेळी ८ ठिकाणी छापे टाकले. यामध्ये रियासी, उधमपूर, रामबन, किश्तवाड आणि डोडाचा समावेश आहे.

मागील काही दिवसांमध्ये राज्यात घुसखोरीच्या प्रकारात वाढ झाली आहे. त्याची गंभीर दखल घेत राष्ट्रीय तपास संस्थेने ही कारवाई केली आहे. सुमारे आठवडाभरापूर्वी 'एनआयए'ने दहशतवाद्यांना आर्थिक रसद पुरवल्याप्रकरणी जम्मूच्या बजलहटा येथे साहिल अहमद याच्या घरावर छापा टाकला होता. तपासादरम्यान एनआयएला साहिल अहमदच्या खात्यात १५ लाख रुपये संशयास्पदरित्या जमा झाल्याचे आढळले होते. अहमदाबादच्या मोस्ट वॉण्टेड यादीत समाविष्ट असलेल्या हुमायून खान नावाच्या फरारी गुन्हेगाराने १५ लाख रुपयांची ही रक्कम जमा केल्याचेही स्पष्ट झाले होते.

साहिल अहमद याचा काका गुलजार अहमद मलिक १९९२ मध्ये हिजबुल मुजाहिद्दीनचा दहशतवादी बनला होता, असे एनआयएच्या तपासात समोर आले होते.. गेल्या काही वर्षांपासून तो पाकिस्तानातील सियालकोट येथे राहत होता. एनआयआयएच्या टीमने साहिल आणि त्याच्या काही नातेवाईकांचीही चौकशी केली होती.

# महाराष्ट्रातील तापमानात होणार घट; तुरळक पावसाचा अंदाज!

पुणे : बंगालच्या उपसागरात शनिवारपर्यंत कमी दाबाच्या क्षेत्राची निर्मिती होणार असून, याच्या प्रभावामुळे राज्यात पुढील आठवड्यात तुरळक पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. दरम्यान, राज्यात थंडीचा कडाका वाढला असून, पुढील काही दिवस तो कायम राहण्याचा अंदाज आहे.

दक्षिण अंदमानच्या समुद्रात सध्या हवेची द्रोणीय स्थिती असून, २३ नोव्हेंबरपर्यंत त्याचे कमी दाबाच्या क्षेत्रात रुपांतर होणार आहे. त्यानंतर पुढे या क्षेत्राची तीव्रता वाढणार आहे. हे क्षेत्र पश्चिम-उत्तर पश्चिमेकडे प्रवास करणार असून, यामुळे तामिळनाडू, केरळ, पाँडेचरी, आंध्र प्रदेशच्या भागात जोरदार पाऊस होणार आहे. याच्या प्रभावामुळे राज्यात बाष्पयुक्त हवा वाहणार असून, खासकरुन दक्षिण महाराष्ट्राच्या भागात ढगाळ वातावरण, तुरळक पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यामुळे थंडीचा कडाका कमी होणार असून, किमान तापमान वाढणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

कोल्हापूर-दक्षिण कोकणात पाऊस

गेल्या आठवड्यात बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे दक्षिण महाराष्ट्रात पाऊस झाला होता. आताही तशीच स्थिती निर्माण झाली असून, २६ नोव्हेंबरनंतर कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्गच्या भागात पावसाचा अंदाज आहे.

हुडहुडी कायम

राज्यात थंडीने हुडहुडी भरविली असून, उत्तर महाराष्ट्र, मराठवाड्यात याचा कडाका जास्त आहे. पुढील पाच दिवस थंडी कायम असेल, त्यानंतर काही ठिकाणी ढगाळ वातावरण राहणार असल्याने कडाका कमी होईल.

# अदानी समूहाचे थेट २० टक्क्यांपर्यंत कोसळले स्टॉक्स!

नवी दिल्ली : हिंडेनबर्ग रिसर्च रिपोर्टमुळे अडचणीतून सावरलेला अदानी समूह पुन्हा गोत्यात आला आहे. आज शेअर उघडताच सर्व स्टॉक धडाधड कोसळल्याचे दिसून आले. गौतम अदानी यांच्यावर लाच आणि फसवणूकीच्या आरोपामुळे याचा जोरदार फटका अदानी समूहाच्या शेअर्सला बसला आहे.

समूहातील सर्व १० लिस्टेड कंपन्यांचे शेअर्स घसरले. अदानी एनर्जी सोल्यूशन्सचा शेअर २० टक्क्यांनी घसरून ६९७.७० रुपयांवर आला आणि शेअरला लोअर सर्किट लागले आहे. त्यामुळे याचा मोठा झटका गुंतवणूक दारांनाही बसला आहे.

अदानी यांच्यावर सौर प्रकल्पांचे कंत्राट आणि वित्तपुरवठा करण्यासाठी मोठी लाच दिल्याचा आरोप असून त्यांनी ही बाब अमेरिकन गुंतवणूकदारांपासून लपवली आहे. त्यामुळे अमेरिका न्यायालयाने गौतम अदानी यांना लाचखोरी आणि फसवणुकीचा आरोपाखाली दोषी ठरवले आहे. या संपूर्ण प्रकरणात अदानी यांचा पुतण्या आणि अदानी ग्रीन एनर्जीचे कार्यकारी संचालक सागर अदानी आणि कंपनीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी विनीत जैन यांच्यासह अन्य आरोपी आहेत.

### कोणत्या शेअरमध्ये किती घसरण?

अदानी ग्रीन एनर्जी : १९.१७ टक्के
अदानी टोटल गॅस : १८.१४ टक्के
अदानी पॉवर : १७.७९ टक्के
अदानी पोर्ट्स : १५ टक्के
अंबुजा सिमेंट : १४.९९ टक्के
एसीसी : १४,५४ टक्के
एनडीटीव्ही : १४.३७ टक्के
अदानी विल्मर : १० टक्के

# उत्तर प्रदेशात ट्रक अन् खासगी बसची जोरदार धडक; ५ जणांचा मृत्यू, १५ जण जखमी!

उत्तर प्रदेश : उत्तर प्रदेशातील अलीगढमध्ये यमुना एक्सप्रेस वेवर भीषण अपघात घडल्याची बातमी समोर आली आहे. एका खासगी डबल डेकर बस आणि ट्रकची जोरदार धडक झाल्याने भीषण अपघात घडला. यामध्ये ५ जणांचा जागीच मृत्यू झाला असून १५ जण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशातील अलीगढमध्ये यमुना एक्सप्रेस वेवर मध्यरात्री अडीच वाजेच्या सुमारास हा अपघात झाला. दिल्लीहून आजमगढला जाणाऱ्या एका डबल डेकर बसने ट्रकला मागून धडक दिली. चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाल्याची शक्यत वर्तवण्यात येत आहे. तर प्रवाशांनी चालक नशेत होता असेही म्हटले आहे. मात्र त्यावर जखमी कंडक्टरने चालक नशेत नव्हता असा दावा केला आहे.




जखमींची माहिती

अपघातात मृत्यू झालेल्यांमध्ये पाच महिन्याचे बाळ, एक महिला आणि तीन पुरुष यांचा समावेश आहे. तर जखमींमध्ये ११ महिन्यांची चिमुकली, एक लहान मुलगी, पाच वर्षांचा मुलगा, तीन महिला आणि ९ पुरुष आहेत. दरम्यान, स्थानिक पोलिसांनी रेस्क्यू करत सर्व जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केलं.

मुख्यमंत्री योगींनी दिल्या सूचना

अलिगढ दुर्घटनेची मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दखल घेतली असून शोक व्यक्त केला आहे. तसेच जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करून त्यांच्यावर योग्य उपचार करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. यासोबतच जखमींच्या लवकरात लवकर बरे व्हावी अशा आशा व्यक्त केली आहे.

# इलेक्शन कामातून परतताना शिक्षकाचा मृत्यू



जळगाव : काल राज्यभरात विधानसभा निवडणुकीचे मतदान पार पडले. अशावेळी प्रत्येक जिल्ह्यातील शिक्षक इलेक्शन ड्यूटीमध्ये व्यस्त असतात. मात्र त्याचदरम्यान जळगाव जिल्ह्यात एक दुर्दैवी घटना घडली आहे. जळगाव जिल्ह्यात मतदान कर्तव्यावर असलेल्या एका शिक्षकाचा इलेक्शन ड्यूटीहून परतताना भीषण अपघात झाला. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला असून परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मीकांत वासुदेव पाटील (४९) उपशिक्षक अनवर्दे बुधगांव हे इलेक्शन ड्यूटीवरुन त्यांच्या बभळाज तालुका शिरपूर मूळगावी जात होते. मात्र यादरम्यान सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास त्यांच्या दुचाकीचा भीषण अपघात झाला. घटनेनंतर स्थानिकांनी त्यांना चोपडा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

दरम्यान, लक्ष्मीकांत पाटील यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून घटनेची माहिती मिळताच जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांनी घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जाहीर प्रगटन

**मा.श्री ए.बी. बिरादार साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात.**

एम ए आर जे आय नंबर ४१६/२०२४

अर्जदार – १) आनंदाबाई अर्जुन सोनवने (कोळी) वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. डकला ता, सिल्लोड जि औरंगाबाद २) भिमराव अर्जुन सोनवने वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. डकला ता, सिल्लोड ज़ि औरंगाबाद ३) सुरेश अर्जुन सोनवने वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. डकला ता. सिल्लोड ज़ि औरंगाबाद ४) रमेश अर्जुन सोनवने वय ४० वर्षे, धंदा– शेती, रा. डकला ता. सिल्लोड ज़ि औरंगाबाद ५) कडुबाई सुधाकर पवार वय ६४ वर्षे, धंदा घरकाम, रा. मासरुळ ता. जि. बुलढाणा

विरुद्ध

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद.

विषय : बाम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये अर्ज

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येतो की, अर्जदाराचे वकिल ॲड. अनिल एस. लोखंडे यांच्या मार्फत अर्जदार यांनी मयत अर्जुन तुकाराम सोनवने यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा. सिल्लोड न्यायालयात अर्ज दाखल केला असुन मयत अर्जुन तुकाराम सोनवने हे मौजे डकला ता. सिल्लोड येथील रहिवाशी होते व त्यांचा दि.०२/१०/२०२४ रोजी मौजे मासरूळ ता. जि. बुलढाणा येथे मृत्यु झालेला आहे. अर्जदार क्र. ०१ हि मयत अर्जुन तुकाराम सोनवने यांची पत्नी असुन अर्जदार क्र. ०२ ते ०४ हे मुले असून अर्जदार क्र.०५ हि त्यांची मुलगी आहे. अर्जदार क्र. ०१ ते ०५ यांच्या व्यतिरीक्त मयत अर्जुन तुकाराम सोनवने यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत अर्जदार यांना मयत अर्जुन तुकाराम सोनवने यांच्या वारस प्रमाणपत्राची शासकीय व निमशासकीय कामासाठी तसेच महसुल कामासाठी आवश्यकता असल्याने अर्जदारांना सदरचा अर्ज मा, न्यायालयात दाखल करण्याचे कारण घडले आहे. जर अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत अर्जुन तुकाराम सोनवने यांचे कायदेशीर वारस नसल्या बाबत ज्या कोणास आक्षेप उजर हरकती असेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासुन २३० दिवसाच्या आत आक्षेप उजर हरकती या न्यायालयात हजर होऊन सादर करावयात जर मुदतीत कोणी आक्षेप उजर हरकती नोंदवाव्यात नसता अर्जदार यांच्या हक्तात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता प्रस्तुत जाहिर प्रगटन आज दि. १८/११/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख दि.०३/०१/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सिल्लोड

# पालघर एमआयडीसीमधील कारखान्याला भीषण आग!



पालघर : पालघरमध्ये तारापूर एमआयडीसीजवळील एका कारखान्याला भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. घटनोची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून सध्या आग विझवण्याचे काम सुरु आहे. आगीमुळे परिसरात धुराचे मोठे लोट पसरले आहेत. याबाबतचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. परंतु आग लागण्याचे कारण अद्यापही समजू शकलेले नाही.

# भीतीमुळे तुमच्या निवृत्तीनंतरच्या गुंतवणुकीत अडथळा येऊ नये

पुणे : भीती ही अनिश्चिततेची एक नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. विशेषत: सेवानिवृत्तीच्या नियोजनाचा विचार करताना ती अधिक जाणवते. तथापि आर्थिक निर्णय घेताना भीतीला वर्चस्व गाजवू दिल्यास भविष्यातील सुरक्षितता हिरावून घेतली जाते. दीर्घकालीन आर्थिक निर्णय घेताना भीती ओळखणे आणि भीतीने घाबरून जाण्याऐवजी त्यांचे व्यवस्थापन कसे करावे हे शिकणे आवश्यक आहे. बंधन एएमसीचे सेल्स अँड मार्केटिंग हेड गौरब पारिजा म्हणतात, एक धोरणात्मक, माहितीपूर्ण दृष्टीकोन कठीण बाजाराच्या काळात तुम्हाला तुमच्या सेवानिवृत्तीच्या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करण्याची सुविधा प्रदान करते.

ते म्हणाले, रिटायरमेंट प्लानिंगसाठी दीर्घकालीन (लॉन्गटर्म) विचार करणे खूप गरजेचे आहे. भविष्यात काय होईल, याची कुणीही अचूक भविष्यवाणी करू शकत नाही. परंतु लॉंगटर्म लक्ष्यांवर केंद्रित गुंतवणूक निश्चितच मदत करते. त्यामुळे तुम्ही जो पैसा वाचविता. भविष्यात तुम्हाला त्याची आवश्यकता भासते. बाजार सतत वर – खाली जातात आणि जर तुम्ही अल्प–मुदत कालावधीच्या चक्रांवर प्रतिक्रिया दिली तर तुम्ही चुकीचे गुंतवणुकीचे निर्णय घेऊ शकता. अज्ञात भीती तुम्हाला अशा संधींपासून दूर नेऊ शकते, ज्यामुळे तुमच्या पैशाची संभाव्य वाढ प्रदान करू शकते.

पारिजा यांच्या मते, काहीही न करण्याचा मोठा धोका म्हणजे



महागाई दर आहे. तुमचे पैसे निष्क्रिय ठेवण्याचा हा कथित सुरक्षित मार्ग कालांतराने त्याचे मूल्य कमी करण्यास मदत करतो. वस्तू आणि सेवांची किंमत जसजशी वाढत जाते, तसतशी तुमच्या पैशाची क्रयशक्ती कमी होते. म्हणूनच गुंतवणूक अशाप्रकारे केली जाणे आवश्यक आहे, जे तुमच्या सेवानिवृत्तीच्या उद्दिष्टांसाठी तुमची संपत्ती सुरक्षित ठेवतील आणि महागाईपेक्षा जास्त दराने वाढतील, जेणेकरून तुमच्या बचतीत गुंतवलेले पैसे महागाईत वाया जाणार नाहीत.

पारिजा पुढे म्हणाले, कंपाऊंडिंगची शक्ती लवकर सुरू करून आणि नियमितपणे गुंतवणूक करून वापरली पाहिजे, निवृत्तीनंतरची बचत वाढविण्यासाठी चक्रवाढ परतावा आवश्यक आहे. पुनर्गुंतवणूक करून एखादी व्यक्ती केवळ महागाईचा सामना करत नाही तर बाजारातील अस्थिरतेपासून एखाद्याच्या बचतीचे रक्षण करते. जर लहान योगदान कालांतराने सातत्याने केले गेले, तर ते लक्षणियरीत्या मोठ्या निवृत्ती निधीमध्ये (रिटायरमेंट फंड) जोडतात.

पारीजा पुढे म्हणाले, गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळविण्याची गुरुकिल्ली म्हणजे भावनिकदृष्ट्या मजबूत राहणे आवश्यक आहे. निवृत्तीचे नियोजन अधिक शिस्तबद्ध असले पाहिजे. तसेच दैनंदिन बाजारातील हालचालींचे अनुसरण करण्याऐवजी दीर्घकालीन उद्दिष्टे पूर्ण करण्यावर लक्ष्य केंद्रित केले पाहिजे. अल्प मुदतीच्या अस्थिरतेवर प्रतिक्रिया देण्याऐवजी मॅक्रो इकॉनॉमिक ट्रेंड समजून घेणे गरजेचे आहे. ते तुम्हाला शांत राहण्यास आणि तुमच्या योजनेसाठी वचनबद्ध राहण्यास नक्कीच मदत करेल. भीती वाटणे साहजिक आहे, पण भीती ती तुमच्या गुंतवणुकीचे धोरण थांबवण्याचे कारण असू नये. तुमचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्यासाठी शांत, विचारशील गुंतवणूकीचा दृष्टिकोण खूप आवश्यक आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क.५१०/२०२४

अर्जदार :– १. हकीम पि. अकबर शेख, वय ६३ वर्षे, धंदा, शेती, रा. प्रतापपुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, २. सायराबी भ्र. अय्युब पठाण, वय ५६ वर्ष, धंदा, घरकाम, रा. रसुलपुरा, खुल्ताबाद ता. खुल्ताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर, ३. शकिलाबी भ्र. गणी शेख, वय ५२ वर्ष, धंदा, घरकाम, रा. अगरकानडगाव, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, ४. शाबेराबी भ्र. रफिक पठाण, वय ५० वर्ष, धंदा, घरकाम, रा. नंद्राबाद, वाळुज, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदारः– निरंक

प्रकरणः– वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे करीता अर्ज.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. टी. व्ही. कोल्हे यांचे मार्फत न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदार क. २ ते ४ हया अर्जदार क. १ च्या विवाहीत बहीनी आहेत. अर्जदार यांचे वडील नामे अकबर पि. दादा शेख, रा. प्रतापपुर, ता. गंगापुर हे दिनांक ०९/०७/२०१७ रोजी प्रतापपुर ता. गंगापुर येथे मयत झाले असुन अर्जदार यांची आई ही देखील बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेली आहे. मयत अकबर शेख यांना अर्जदार हे एकमेव वारस असुन या अर्जदारां व्यतीरिक्त इतर कुणीही वारस नाहीत. अर्जदारांना शासकिय, निमशासकिय कामाकरीता ते मयत अकबर पि. दादा शेख यांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप प्रमाणपत्र) आवश्यकता आहे.

त्याआर्थी तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, ज्या कुणास अर्जदारांनी विनंती केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यास आक्षेप उजर असेल त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत तसा लेखी आक्षेप या मा. न्यायालयात दाखल करावा अन्यथा कायदयाप्रमाणे पुढील आदेश पारित करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन आज दिनांक २१/११/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी प्रसिध्द केले.

आदेशानुसार

सहा. अधिक्षक

दिवाणी तथा फौजदारी न्यायालय गंगापुर

ता. गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. आग्रवाल मॅडम यांचे कोर्ट मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हिल एम.ए. क्र. ५०८/२०२४

अर्जदार : १) कोमल भ्र. सागर नितनवरे वय २४ वर्षे, धंदा घरकाम रा. नरसापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) विहान पि. सागर नितनवरे, वय ०४ वर्षे, अज्ञान पालन कर्ती आई अर्जदार क्र.१ ३) जान्हवी पि. सागर नितनवरे, वय १० महिने अज्ञान पालन कर्ती आई अर्जदार क्र.१ ४) लक्ष्मीबाई भ्र. प्रकाश नितनवरे, वय ६७ वर्षे, धंदा घरकाम रा. नरसापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. आर. के. गायकवाड यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची आई असुन अर्जदार क्र.४ ही अर्जदार क्र.१ ची सासु व अर्जदार क्र.२ व ३ यांची आजी (वडीलांची आई) आहे. अर्जदार क्र.१ चे पति, अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील व अर्जदार क्र.४ चा मुलगा नामे सागर प्रकाश नितनवरे हे मौजे नरसापुर ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०२/०८/२०२४ रोजी मौजे नरसापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयत सागर प्रकाश नितनवरे यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप – उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १६/११/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क. ५२२/२०२४

अर्जदार :– १. लिलाबाई भ्र. भाउसाहेब पवार, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. लासुर स्टेशन ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, २. उल्वला भ्र. अरूण पगारे, वय ३३ वर्ष, धंदा शेती, रा. शिउर, ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, ३. ज्योती भ्र. मिलींद कांबळे, वय ३३ वर्ष, धंदा घरकाम, रा. पवननगर, रांजनगाव शे.पु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर, ४. किशोर पि. भाउसाहेब पवार, वय ३२ वर्ष, धंदा शेती, ५. गणेश पि. भाउसाहेब पवार वय २८ वर्ष, धंदा शेती, दोघे रा. लासुर स्टेशन ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, ६. मोनिका भ्र. सुधीर तुपेरे, वय २३ वर्ष, धंदा घरकाम, रा. पंचशिल बुध्द विहार जवळ, रमाबाई सहकारनगर, नवजिवन चाळ, घाटकोपर, मुंबई.

विरूध्द

गैरअर्जदार :– निरंक

प्रकरण :– हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. एस.के. नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ६ ची आई असुन अर्जदार क. १ चे पती म्हणजेच अर्जदार क. २ ते ६ चे वडील नामे भाउसाहेब शिवाजी पवार, हे दिनांक १३/०५/२०२१ रोजी घाटी रुग्नालय, छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. मयत शिवाजी पवार यांचे आई वडील हे दोघेही मयत झालेले आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयत भाउसाहेब शिवाजी पवार यांचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माइया सही व शिक्याने आज दिनांक १८/११/२०२४ रोजी दिले.

आदेशानुसार

सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क. ५१८/२०२४

अर्जदार :– १. फैसल पि. सालम हिलाबी, वय ५५ वर्षे, धंदा मजुरी, रा. शेंदुरवाधा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर, २. नफिसा भ्र. अदनान बीन सुलतान, वय ६२ वर्ष, धंदा घरकाम, ३. सलिम पि. सालम हिलाबी, वय ५४ वर्ष, धंदा मजुरी, दोघे रा. नवाबपुरा, ता. जि. छत्रपती संभाजीनगरए ४. फिरदोस भ्र. खालेद बारशेद, वय ३८ वर्ष, धंदा घरकाम, रा. इंदीरानगर, बायजीपुरा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. बी.आर.राजपुत यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार हे आपसात सख्ये भाउ बहीन असुन त्यांचे वडील नामे सालम बिन पि. अमर हिलाबी हे दिनांक ०८/०५/१९८९ रोजी मयत झाले असुन त्यांच्या पश्चात अर्जदार व मयताची पत्नी मरीयम हे वारस होते. मरीयम भ्र. सालम हिलाबी हया दिनांक २९/११/२००९ रोजी मयत झाल्या आहेत. अर्जदारांचे मयत पिता यांचे नावे गंगापुर नगर परीषद हद्दीत मिळकत क. ७४ वार्ड क. ३ ही मिळकत असुन त्याचे बाजार मुल्य ३,९६,२८४/– सदर मिळकत अर्जदारांच्या नावे नोंद करण्याकरीता हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक १८/११/२०२४ रोजी दिले.

आदेशानुसार

अधिक्षक

दिवाणी न्यायालय वैजापुर, ता. वैजापुर

## जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर सिव्हील एम.ए. क्र.४५७/२०२४ पुढील तारीख दिनांक १६/११/२००८

अर्जदार : १) लताबाई गोविंद जेजुरकर, वय ५३ वर्ष धंदा गृहिणी रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) अमोल गोविंद जेजुरकर, वय ३४ वर्षे धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) मनोज गोविंद जेजुरकर, वय ३३ वर्षे धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) किशोर गोविंद जेजुरकर, वय ३१ वर्षे धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :– निरंक

प्रकरण :– कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. डि. के. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ न ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे गोविंद अंबादास जेजुरकर हे मौजे मांजरी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक १०/०९/२०२४ मयत झालेले आहे. मयत गोविंद अंबादास जेजुरकर यांना अर्जदारांशिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमुद करुन या मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्दीनंतरचा आक्षप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणं वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०४/११/२०२४ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक १६/११/२०२४ रोजीची आहे.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हील एम.ए. क्र. ४६४/२०२४

पुढील तारीख २७/११/२०२४

अर्जदार : १) सुलोचना रामनाथ गाढेकर, वय ७५ वर्षे, धंदा शेती, २) लक्ष्मण आसाराम वाघ, वय ५४ वर्षे, धंदा शेती, ३) सुनिल आसाराम वाघ, वय ५० वर्षे, धंदा शेती, ४) रुखमनबाई भ्र. जगन्नाथ वाघ, वय ५४ वर्षे, धंदा शेती ५) जगदीश पि. जगन्नाथ वाघ, वय ३९ वर्षे, धंदा शेती, ६) वसंत पि. जगन्नाथ वाघ, वय ३५ वर्षे, धंदा शेती, ७) अविनाश पि. जगन्नाथ वाघ, वय ३२ वर्षे, धंदा शेती, सर्व रा. वाळुज बु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : राम आसाराम वाघ, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. वाळुज बु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

प्रकरण :– कलम २ मुंबई विनियमन कायदा १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. डि. के. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ व गैरअर्जदार हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क्र.४ ही अर्जदार क्र.१ ते ३ व गैरअर्जदार यांचा मयत भाऊ नामे जगन्नाथ आसाराम यांची पत्नी आहे व अर्जदार क्र. ५ ते ७ हे मुले आहेत. आसाराम दादाराव वाघ हे दिनांक १८/०८/२०२३ रोजी मौजे वाळुज ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे व तसेच मयत आसाराम दादाराव वाघ यांची पत्नी नामे सरस्वतीबाई आसाराम वाघ ह्या दिनांक २३/०६/२०१५ रोजी मयत झालेले आहे. तसेच मयत आसाराम व मयत सरस्वतीबाई यांचा मुलगा नामे जगन्नाथ आसाराम वाघ हे दिनांक १६/०२/२०२२ रोजी मयत झालेले असुन अर्जदार क्र.४ ते ७ हे मयत जगन्नाथ यांचे वारस आहे. गैरअर्जदार हे अर्ज दाखल करण्यास सहकार्य करत नसल्याने त्यास गैरअर्जदार म्हणुन समाविष्ट करण्यात आलेले आहे. उभयतांशिवाय मयतास अन्य वारस हयात नसल्याचे नमुद करुन या मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०४/११/२०२४ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक २७/११/२०२४ रोजीची आहे.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क– स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र १८४/२०२४

अर्जदार : १) विजया विनायक महालपुरे, वय–५९ वर्ष धंदा–घरकाम २) चेतना सुरेंद्र कुंभारे, वय–३४वर्ष धंदा–घरकाम ३) चेतन विनायक महालपुरे वय–३० वर्ष धंदा–शेती १ ते ३ रा. गोंदेगाव ता. सोयगाव, जि. औरंगाबाद ४) स्मिता महेंद्र खोडके वय–३७वर्ष धंदा–घरकाम रा. १०५ माउली धाम, कल्याण शील रोड, सोनारपाडा, शंकर नगर, डोंबिवली पूर्व, कल्याण जि.ठाणे.

–: विरुध्द :–

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ यांचे सासरे व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे आजोबा कै.जगन्नाथ उर्फ बाबू शंकर महालपुरे यांचा दिनांक– १४/१०/२०१५ रोजी मौजे गोंदेगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत कै. जगन्नाथ उर्फ बाबू शंकर महालपुरे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १९/१२/२०२४. आज दि. १५/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क–स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क– स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र.१७८/२०२४

अर्जदार : १) जिजाबाई पंडित मोरे वय–७०वर्ष धंदा–घरकाम २)सुशील पंडित मोरे वय–३४वर्ष धंदा–शेती ३) ज्योती प्रकाश पाटील वय–३६वर्ष धंदा–घरकाम वरील सर्व रा.तितूर ता.सोयगाव जि. औरंगाबाद

–: विरुध्द :–

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी.सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै. पंडित शिवराम मोरे यांचा १४/०१/२०१४ रोजी अल्पशा आजाराने मौजे तितूर, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे कै. पंडित शिवराम मोरे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ३ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०९/१२/२०२४. आज दि.१५/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क–स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क– स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र.१६७/२०२४

अर्जदार : १) सकुबाई भगवान सोनवणे, वय–६८ वर्ष धंदा–घरकाम २) संजय भगवान सोनवणे, वय–४५ वर्ष धंदा–शेती ३) सुकलाल भगवान सोनवणे, वय–४२ वर्ष धंदा– शेती ४) छायाबाई दिलीप मोरे, वय–३९ वर्ष धंदा–घरकाम सर्व रा. शिंदोळ ता. सोयगाव जि. औरंगाबाद

–: विरुध्द :–

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. एस.पी.सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील कै. भगवान भिवा सोनवणे यांचा १९/०९/२०२१ रोजी अल्पशा आजाराने मौजे शिदोळ, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. भगवान भिवा सोनवणे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २९/११/२०२४. आज दि. १५/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क–स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क– स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १६८/२०२४

अर्जदार : १) सईदाबी युनुसखा पठाण वय–७०वर्ष धंदा–घरकाम २) सुभेखा युनुसखा पठाण वय–४९वर्ष धंदा–शेती ३) हमीदखा युनुसखा पठाण वय–४७वर्ष धंदा–शेती ४) अफजलखा युनुसखा पठाण वय–४५वर्ष धंदा–शेती ५) अनिसाबी शेख महेमूद वय–४३वर्ष धंदा–घरकाम वरील सर्व रा. तिखी ता. सोयगाव जि. औरंगाबाद

–: विरुध्द :–

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील मयत युनुसखा यासिनखा पठाण यांचा ०७/१०/२०२२ रोजी वृद्धपकाळाणे मौजे तिखी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत युनुसखा यासिनखा पठाण यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ५ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ५ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २८/११/२०२४. आज दि. १५ /११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क–स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश, क– स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १६०/२०२४

अर्जदार : १) चिंधाबाई ओंकार सोनवणे, वय–७० वर्ष धंदा–घरकाम २) उज्याबाई रोहिदास गायकवाड (भिल), वय–५० वर्ष धंदा–घरकाम ३) चंदाबाई ओंकार सोनवणे वय–५८ वर्ष धंदा– घरकाम ४) मंगलबाई सोमीनाथ मोरे, वय–४५ वर्ष धंदा–घरकाम सर्व रा. शिंदोळ ता. सोयगाव जि. औरंगाबाद

–: विरुध्द :–

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ यांचा मुलगा व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे भाऊ कै. रमेश ओंकार सोनवणे (भिल्ल) यांचा १९/०५/२०१६ रोजी अल्पशा आजाराने मौजे शिंदोळ, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला आहे. तसेच कै. रमेश ओंकार सोनवणे (भिल्ल) दोन्ही डोळ्यांनी अंध असल्याने ते अविवाहित मयत झालेले असल्याने त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. रमेश ओंकार सोनवणे (भिल्ल) यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २७/११/२०२४. आज दि. १५/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क–स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र.१५९/२०२४

अर्जदार : १) राधाबाई हिरामण राजपूत, वय–७० वर्ष धंदा–धरकाम २) नगीना ईश्वर परदेशी, वय–४८वर्ष धंदा–शेती ३) पदमसिंग हिरामण राजपूत वय–४०वर्ष धंदा–शेती वरील १ ते ३ रा.पळाशी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद ४) गीताबाई विजय परदेशी वय–४५ वर्ष धंदा–घरकाम रा.नांदगाव ता. सोयगाव जि. औरंगाबाद. ५) मथुराबाई रमेश परदेशी वय–३६वर्ष धंदा. घरकाम रा. निमखेडी ता. सोयगाव जि. औरंगाबाद ६) अभय हिरामण राजपूत वय–३४ वर्ष धंदा. शेती रा.पळाशी, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद

–: विरुध्द :–

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील कै. हिरामण गोटीराम राजपूत यांचा १७/१२/२०११ रोजी वृद्धपकाळाणे मौजे पळाशी, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे कै. हिरामण गोटीराम राजपूत यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ६ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ६ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २६/११/२०२४. आज दि. १५/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क–स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९७/२०२४

१. भोला लाला राठोड, वय २२ वर्ष, धंदा शेती, रा. नांदगाव तांडा, ता, सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.

विरूद्ध

कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनील गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत मिराबाई लाला राठोड यांचा दि. ३०.०९.२०२४ रोजी मौजे नांदगाव तांडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत मिराबाई लाला राठोड यांचे वारस असुन त्यांना मयत मिराबाई लाला राठोड यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी दि.१९/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. ४/१/२०२५.

आदेशावरून

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सिल्लोड)

## विराज प्रोफाईल्सने सुरु केली नवीन सीमलेस स्टेनलेस स्टील पाईप उत्पादन प्रक्रिया, पियर्सर मिलचे उद्घाटन

पुणे- विराज प्रोफाईल्स लिमिटेड, जो भारतातील स्टेनलेस स्टील उत्पादन क्षेत्रातील एक प्रमुख खेळाडू आहे, आपल्या उत्पादन क्षमतांमध्ये मोठा विस्तार करत आहे. कंपनीने नुकतेच महाराष्ट्रातील बोइसर येथे नवीन सीमलेस पाईप प्लांटमधील अत्याधुनिक पियर्सर मिलचे उद्घाटन केले. या नव्या प्रकल्पाद्वारे उच्च-शक्तीचे सीमलेस स्टेनलेस स्टील पाईप तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हे पाऊल विराज प्रोफाईल्सच्या रणनीतिक विस्ताराचा एक भाग आहे, ज्यामुळे कंपनी सीमलेस पाईप्सच्या उच्च-गरजेच्या क्षेत्रात आपले स्थान मजबूत करेल. सीमलेस पाईप्स ही अत्यंत ताकदवान, टिकाऊ आणि गंज प्रतिरोधक असतात, जे अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये अत्यावश्यक असतात. हे पाईप्स तेल आणि गॅस, एरोस्पेस, ऊर्जा आणि बांधकाम अशा विविध उद्योगांमध्ये अत्यधिक दाब आणि ताण सहन करण्यासाठी आवश्यक असतात.

## द झेविअर ॲप्टिट्यूड टेस्टच्या नोंदणीची तारीख 30 नोव्हेंबर

मुंबई : द झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट , या राष्ट्रीय पातळीवरील ख्यातनाम एमबीए प्रवेश परीक्षेतर्फे द झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट २०२५ साठी नोंदणी करण्याची अंतिम तारीख जाहीर करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी बिझनेस मॅनेजमेंट करिअरच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरील या महत्त्वाच्या वळणासाठी ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करायची आहे. ही परीक्षा ५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २ ते सायं. ५.३० या वेळेत घेतली जाणार आहे.७५ वर्षांचा वारसा जपणाऱ्या द झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट ने भारतभरातील मॅनेजमेंट अभ्यासक्रम इच्छुकांसाठी अत्यंत महत्त्वाची परीक्षा अशी ओळख निर्माण केली आहे. १५ जुलै २०२४ रोजी सुरू झालेल्या नोंदणी प्रक्रियेत आतापर्यंत लक्षणीय प्रतिसाद लाभला आहे. त्यामुळे एमबीए/ पीजीडीएम इच्छुकांमध्ये या परीक्षेचे महत्त्व वाढत असल्याचे अधोरेखित झाले आहे. भारतातील २५० हून अधिक बिझनेस स्कूलमधील प्रवेशासाठी द झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट हे प्रवेशद्वार आहे.

## स्नैपड्रैगन ८ एलीट सह फ्लॅगशिप आईकू १३ करणार लाँच

पुणे : उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू ३ डिसेंबर रोजी आईकू१३ लाँच करण्यासाठी सज्ज आहे. स्मार्टफोन इनोव्हेशनमध्ये नवीन मानके सेट करत, आईकू १३ प्रगत कॅमेरा क्षमता, आकर्षक डिझाइन, विस्तारित बॅटरी लाइफ आणि इमर्सिव्ह डिस्प्ले टेक्नॉलॉजीसह लाइटनिंग-फास्ट कार्यप्रदर्शन एकत्र करते जे वापरकर्त्यांना त्यांच्या स्मार्टफोनमधून सर्वोत्तम कामगिरी, डिझाइन आणि कार्यक्षमतेची अपेक्षा आहे त्यांना इमर्सिव्ह अनुभव प्रदान करते. आईकू १३ आतापर्यंतच्या सर्वात वेगवान प्रोसेसरवर चालते - नवीन स्नॅपड्रॅगन ८ एलिट, ज्याने ३ दशलक्षपेक्षा जास्त प्रभावी अंतुतु स्कोअर प्राप्त केला आहे. या पॉवरहाऊसला अतुलनीय गेमिंग अनुभवासाठी २के (पीसीग्रेड) गेम सुपर रिझोल्यूशन आणि १४४ एफपीएस गेम फ्रेम इंटरपोलेशनसह सुपरकंप्युटिंग चिप क्यू २ द्वारे समर्थित आहे. यात ७०००मिमीऑ वीसी शीतकरण प्रणाली देखील आहे, जी तापमान नियंत्रणात ठेवते.

## नगर जिल्ह्यात ७२.७४ टक्के मतदान

अ.नगर : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता जिल्ह्यात ७२.७४ टक्के मतदान झाले असल्याची माहिती प्रशासनाने दिली. जिल्ह्यातील मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान केल्याबद्दल जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी सर्व मतदारांचे अभिनंदन केले आहे. लोकशाहीच्या या उत्सवात मतदारांचा सहभाग कौतुकास्पद आहे. लोकशाही बळकट करून जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेला गती देण्यासाठी हा सहभाग महत्वाचा ठरेल असे जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रशासनातर्फे आयोजित विविध उपक्रमात सहभागी जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, पोलीस, शिक्षण आणि शासनाचे विविध विभाग, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी आणि त्यांचे सहकारी, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सामाजिक - शैक्षणिक संस्था, नागरिक यांनादेखील जिल्हाधिकाऱ्यांनी धन्यवाद दिले आहेत. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून जिल्ह्याने ७२.७४ टक्के मतदान शक्य झाले असे श्री. सालीमठ यांनी म्हटले आहे.

## मयूरी साहाने महान संगीतकार ए. आर. रहमान यांना प्रभावित केले



छत्रपती संभाजीनगर - सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन वरील इंडियन आयडॉल १५ मधल्या टॉप १५ स्पर्धकांनी बादशाह, श्रेया घोषाल आणि विशाल ददलानी या तिन्ही परीक्षकांना आपल्या अप्रतिम परफॉर्मन्सेसने प्रभावित केले आहे. या स्पर्धकांपैकी एक आहे, टॉलीगंज, कोलकाताहून आलेली 'आयडॉल की क्लासिक क्वीन' मयूरी साहा. मयूरीने महान संगीतकार ए. आर. रहमानचे लक्ष वेधून घेतले आहे. त्याने मयूरीने गायलेले त्याचे गाणे पोस्ट करून इन्स्टाग्रामवर तिला फॉलो केले आहे. या कौतुकामुळे आनंदित झालेली मयूरी साहा म्हणते, मी लहान असल्यापासून ए. आर. रहमान सरांना आदर्श मानले आहे आणि आता सोशल मीडियावर ते मला फॉलो करत आहेत, हे माझ्या कल्पनेच्या पलीकडचे आहे. हे स्वप्न साकार होण्यासारखे आहे आणि माझ्या परिश्रमाला मिळालेली पावती आहे. ऑडिशनपासून मयूरीचे वेगळेपण ठळकपणे जाणवणारे होते. श्रेया घोषालचा प्लॅटिनम माइक तिला मिळाला होता. आमी जे तोमार ३.० चे क्लासिकल बीटबॉक्स फ्यूजन गाऊन तिने सगळ्यांना मंत्रमुग्ध केले होते. तिचा हा प्रवास देशातील संगीत रसिकांना प्रेरणा देणारा आहे. बघत रहा, इंडियन आयडॉल १५ दर शनिवारी आणि रविवारी रात्री ९:०० वाजता फक्त सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवर!

## केबीसी मध्ये ७ करोडविषयी अभिषेक बच्चनने केलेल्या विनोदाने सगळ्यांना खूप हसवले!

छत्रपती संभाजीनगर - सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील 'कौन बनेगा करोडपती १६' चा एक हास्यविनोदाने आणि हृदयस्पर्शी क्षणांनी भरलेला एपिसोड बघण्यास सज्ज व्हा. सूत्रसंचालनाची धुरा अमिताभ बच्चन यांच्या हातात असलेल्या या कार्यक्रमाच्या शुक्रवारच्या भागात आकर्षक अभिषेक बच्चन, गुणी दिग्दर्शक शूजित सरकार आणि प्रसिद्ध लेखक अर्जुन सेन आपल्या 'आय वॉन्ट टू टॉक' या विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या आगामी चित्रपटाच्या प्रचारासाठी येणार आहेत.अभिषेक नेहमीप्रमाणे आपल्या खास विनोदी शैलीने आणि ऊर्जेने आपली उपस्थिती जाणवून देईल. हा भाग हलकेफुलके क्षण आणि हृदयस्पर्शी संभाषणाने भरलेला असणार आहे. यात बिग बी आणि ज्युनियर बच्चन यांच्यातील खेळीमेळीचे नाते दिसेल. तर मग तयार व्हा मनोरंजन, चातुर्य आणि आत्मियतेने भरलेल्या या रजनीसाठी! आपण ७ करोड ररुपये जिंकलो तर ती बक्षीसाची रक्कम कुठे जाईल याचा तपशील अभिषेक बच्चन देऊ लागला आणि हास्याची कारंजी फुटू लागली. अर्जुन सेन यांनी सांगितले की ते एअर फोर्स वाईव्ज वेलफेअर असोसिएशनसाठी खेळतील आणि शूजित सरकार यांनी मनाली स्ट्रेज या भटक्या कुत्र्यांना मदत करणाऱ्या छत्रज्ञ ला मदत करण्याची आपली इच्छा व्यक्त केली. अभिषेक हलक्या-फुलक्या शैलीत म्हणाला, मी कौन बनेगा करोडपती रॅप पार्टी फंडसाठी खेळेन!

# जिल्ह्यात सरासरी ६९.६४ टक्के मतदान; मतमोजणीसाठी सज्जता




छत्रपती संभाजीनगर,दि.२१ - विधानसभा निवडणूक २०२४ करीता जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदार संघात मिळून एकूण ६९.६४ टक्के मतदान झाले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

आज आयोजित पत्रकार परिषदेस जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके उपस्थित होते.

मतदान प्रक्रिया आटोपून, सर्व मतदान यंत्रे इ. सहसाहित्य स्ट्राँग रुम मध्ये जमा करण्यात आले. हे काम रात्री उशीरापर्यंत सुरु होते. यासंदर्भात आज पत्रकार परिषदेचे आयोजन करुन माध्यमांना माहिती देण्यात आली.

जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघनिहाय (सन २०२४ मध्ये) मतदान टक्केवारी याप्रमाणे-

१०४- सिल्लोड-८०.०८ टक्के, १०५- कन्नड-६९.३१ टक्के, १०६- फुलंब्री-७२.२२ टक्के, १०७-औरंगाबाद मध्य-५९.३५ टक्के, १०८-औरंगाबाद पश्चिम-६०.५८ टक्के, १०९-औरंगाबाद पूर्व-६०.६३ टक्के, ११०- पैठण-७७.५३ टक्के, १११- गंगापूर-७३.७७ टक्के, ११२- वैजापूर-७५,९४ टक्के. असे एकूण सरासरी ६९.६४ टक्के मतदान झाले होते.

जिल्ह्यात एकूण १६ लाख ६३ हजार १८६ पुरुष मतदारांपैकी ११ लाख ७८ हजार ६१७ जणांनी मतदान केले. तर १५ लाख ३९ हजार ४२१ महिला मतदारांपैकी १० लाख ५१ हजार ६७७ महिलांनी मतदान केले. तर इतर मतदारांमध्ये १४४ जणांपैकी ४० जणांनी मतदान केले. एकूण ३२ लाख २ हजार ७५१ मतदारांपैकी २२ लाख ३० हजार ३३४ मतदारांनी मतदान केले. पुरुषांची मतदानाची टक्केवारी ७०.८७ तर महिलांची टक्केवारी ६८.३२ . इतर मतदारांची टक्केवारी २७.७८ टक्के होती. एकूण सरासरी टक्केवारी ६९.६४ टक्के आहे.

सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीच्या तुलनेत झालेले मतदान याप्रमाणे-

सन २०१९ मध्ये जिल्ह्यात २८ लाख ५४ हजार २८१ मतदार होते. त्यात १५ लाख ५ हजार २७६ पुरुष, १३ लाख ४८ हजार ९७९ महिला व २६ इतर मतदार होते. त्यावेळी यापैकी १० लाख २४ हजार ६७२ पुरुष, ८ लाख ४९ हजार ७०८ महिला व इतर ५ असे एकूण १८ लाख ७४ हजार ३८५ जणांनी मतदान केले होते. एकूण टक्केवारी ६५.६७ होती.

**सन २०१९ मध्ये मतदार संघनिहाय झालेले मतदान याप्रमाणे-**

१०४- सिल्लोड- २,३६,७३६- ७४.८३ टक्के, १०५-कन्नड- २,१४,४००- ६८.२५ टक्के., १०६-फुलंब्री- २,२७,१६४- ६९.६८ टक्के., १०७-औरंगाबाद मध्य- १,९२,८०५- ५९.१९ टक्के., १०८-औरंगाबाद पश्चिम-१,९८,१८२- ५९ टक्के, १०९-औरंगाबाद पूर्व- १,९४,३८१- ६०.९ टक्के., ११०-पैठण- २,१२,४९५- ७२.३ टक्के., १११-गंगापूर- २,०२,७५२- ६४.७२ टक्के., ११२-वैजापूर- १,९५,४७०- ६३.१ टक्के.,

**विधानसभा मतदारसंघनिहाय (सन २०२४)मतदानाची 'महिला,पुरुष व इतर' निहाय विगतवारी-**

१०४- सिल्लोड-पुरुष- १,५०,५८५,महिला- १,३६०९५,इतर-२, एकूण मतदान- २,८६,६८२., १०५- कन्नड-पुरुष- १,२२,५१९,महिला- १,०८,०९९,इतर-४,एकूण मतदान- २,३०,६२२, १०६- फुलंब्री-पुरुष-१,४१,५२८,महिला- १,२६,१७६,इतर-२,एकूण मतदान- २,६७,७०६., १०७- औरंगाबाद मध्य- पुरुष-१,१४,९८३,महिला- १,०३,९७८,इतर-५,एकूण मतदान- २,१८,९६६., १०८- औरंगाबाद पश्चिम- पुरुष-१,३०,०१७,महिला- १,१६,६०६,इतर-१५,एकूण मतदान- २,४६,६३८., १०९- औरंगाबाद पूर्व- पुरुष-१,१४,१०४,महिला- १,००,९२१,इतर-४,एकूण मतदान- २,१५,०२९., ११०- पैठण-पुरुष-१,३३,९६४,महिला- १,१८,२७३,इतर-०,एकूण मतदान- २,५२,२३७., १११- गंगापूर-पुरुष-१,४१,७३०,महिला- १,२७,३३७,इतर-८,एकूण मतदान- २,६९,०७५., ११२- वैजापूर-पुरुष-१,२९,१८७,महिला- १,१४,१९२,इतर-०,एकूण मतदान- २,४३,३७९.,

मतदान केंद्रावरील आरोग्य सेवेचा ९४७९ जणांना लाभ

प्रत्येक मतदान केंद्रस्थळी आरोग्य सेवांसाठी आरोग्य सेवा केंद्र उपलब्ध करण्यात आल्या होत्या. या सेवांचा लाभ ८३२४ मतदारांनी घेतला तर ११५५ मतदान कर्मचाऱ्यांनी अशा एकूण ९४७९ जणांनी लाभ घेतला. दरम्यान मतदान प्रक्रियेत ३४ कर्मचाऱ्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. त्यापैकी ८ जणांना खाजगी रुग्णालयात तर २६ जणांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मतमोजणीसाठी सज्जता

शनिवार दि.२३ रोजी होणाऱ्या मतमोजणीसाठी प्रशासनाची सज्जता झाली आहे. आजच मतमोजणीसाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सरमिसळीकरण करण्यात आले. इव्हीएमसाठी १२६ टेबल असतील , टपली मतपत्रिकांसाठी ७० टेबल असतील तर ईटीपीबीएस साठी १२ टेबल असतील, अशी माहिती देण्यात आली. ८५२ मतमोजणी कर्मचारी , २४२ सुक्ष्म निरीक्षक व ३००० पोलीस कर्मचारी असे ५७७८ मनुष्यबळ मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आले आहे. मतदारसंघ निहाय होणाऱ्या मतमोजणीच्या फेऱ्या या प्रमाणे- सिल्लोड-२९, कन्नड-२७, फुलंब्री-२७, औरंगाबाद मध्य-२३, औरंगाबाद पश्चिम -२८, औरंगाबाद पूर्व-२४, पैठण-२६, गंगापूर-२७, वैजापूर-२६.

मतमोजणी कालावधीत व मतमोजणी नंतरही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये म्हणून पुरेसा पोलीस बंदोबस्त, केंद्रीय सुरक्षा बलांच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. संवेदनशील भागात गस्त, ड्रोनद्वारे, सीसीटिव्ही द्वारे गस्त वाढविण्यात आली आहे. सद्यस्थितीत ६ केंद्रीय बल गट तर २ राज्य राखीव पोलीस बल गट जिल्ह्यात तैनात आहेत, अशी माहिती पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी दिली.

## २०५० पर्यंत भारतातील लहान मुलांची संख्या ३५ कोटींवर; हवामान बदल मोठे आव्हान

नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर : २०५० पर्यंत भारतातील लहान मुलांची संख्या ३५ कोटी होईल, मात्र त्यांचे भविष्य सुरक्षित करणे हवामान बदलामुळे गंभीर आव्हान ठरणार आहे, असे युनिसेफच्या ताज्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

सध्या भारतात ४४ कोटींहून अधिक लहान मुले आहेत, परंतु लोकसंख्या घट होऊन ही संख्या १० कोटींनी कमी होईल. अहवालानुसार, हवामान बदल, पर्यावरणीय संकटे आणि तंत्रज्ञानाचे बदल हे मुलांच्या जीवनावर मोठा परिणाम करतील. विशेषतः उष्णतेच्या लाटांमुळे २००० सालाच्या तुलनेत २०५० पर्यंत आठपट जास्त मुलांना याचा तडाखा बसण्याची शक्यता आहे.

हवामान बदलाचा परिणाम आणि आव्हाने

दी एनर्जी रिसर्च इन्स्टिट्यूटच्या (टीईआरआय) सुरुची भडवाल यांनी स्पष्ट केले की, हवामान बदलाचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम लहान मुलांच्या आरोग्य, शिक्षण आणि जीवनशैलीवर दीर्घकालीन परिणाम करतील. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये पर्यावरणीय संकटांशी लढण्यासाठी आवश्यक संसाधनांचा अभाव असल्याने मुलांना जास्त त्रास सहन करावा लागणार आहे.

प्रगत देशांतील आणि कमी उत्पन्न देशांतील तफावत

युनिसेफच्या अहवालात नमूद केले आहे की, उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये ९५% लोक इंटरनेटशी जोडलेले आहेत. तंत्रज्ञानाचा वापर करून हवामान संकटांची आगाऊ सूचना मिळणे शक्य आहे. मात्र, कमी उत्पन्न देशांमध्ये हे प्रमाण फक्त २६% आहे, त्यामुळे या देशांतील मुलांना अधिक धोक्यांचा सामना करावा लागेल.

भारतातील मुलांचे भविष्य आणि उपाययोजना

युनिसेफचे कार्तिक वर्मा आणि भारतातील प्रतिनिधी सिंथिया मॅकॅफ्रे यांनी सांगितले की, भारताने या बदलांना सामोरे जाण्यासाठी मुलांच्या संरक्षणासाठी योजनात्मक उपाययोजना राबवणे आवश्यक आहे. हवामानाशी निगडित धोके ओळखून, शिक्षण, आरोग्यसेवा आणि तंत्रज्ञानाचा उपयोग वाढवणे हेच भविष्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

निष्कर्ष

२०५० पर्यंत भारतातील लहान मुलांची संख्या कमी होणार असली तरी हवामान बदल, उष्णतेच्या लाटा आणि पर्यावरणीय संकटांमुळे त्यांचे भविष्य अनिश्चित होईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग आणि धोरणात्मक उपाय हे या संकटांवर मात करण्याचे प्रमुख साधन ठरतील, असे या अहवालात नमूद आहे.

## बालदिनाच्या कॅन्सलेशनचा कार्यक्रम हेड पोस्टात उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर : येथील जुना बाजारच्या हेड पोस्टात बाल दिनाच्या कॅन्सलेशन चा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जुन्या पोस्ट ऑफिस चे प्रवर डाकपाल सुरेश बनसोडे हे होते तर कार्यक्रमाचे उद्घाटन टपाल तिकीट संग्रह सुधीर कोर्टीकर यांच्या हस्ते बाल दिनाच्या विशेष कॅन्सलेशनची मुद्रा पाकिटावर आणि पोस्टकार्डवर उमटवून करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून जुन्या पोस्ट ऑफिसचे प्रवर डाकपाल सुरेश बनसोडे म्हणाले आपण ज्यांच्या जयंत्या साजऱ्या करतो त्या केवळ एक दिनाचे आपण त्या व्यक्तीचे स्मरण न करता त्यांचे स्मरण प्रत्येकांनी नेहमीच करायला हवे. तर उद्घाटनपर भाषणात टपाल तिकीट संग्रह सुधीर कोर्टीकर म्हणालेचाचा नेहरुंना मुलं खूप प्रिय होती ते त्यांच्यात रममाण होत असतं. आपणं देखील मुलांचे कला गुण छंद जोपासून त्यांना अधिक वेळ द्यायला हवा आपणं असं करु शकलो तरच खऱ्या अर्थाने आपण बालदिन साजरा केला असं होईल.

बालदिनाचा हा विशेष कॅन्सलेशनचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवशंकर पटेल , हरीश नागरगोजे , राज बेरवाल, विनय चामणीकर ( एपीएम मेल ) लखन वैष्णव, संदीप पडस्वान , वाय. जे. पैठणे , रोहिणी कोरडे आणि टपाल तिकीट संग्रहाक उदय नागापूरकर यांनी विशेष परिश्रम घेतले.या कार्यक्रमा साठी अनेक नागरिक व छोटी मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते.मुलांना बालदिनाचा कॅन्सलेशनचा शिक्का उमटलेली विशेष पाकिटे नी पोस्ट कार्ड भेट देण्यात आली.

## संसदेच्या हिवाळी अधिवेशनात गाजणार अदानीचा मुद्दा

### विरोधकांनी चालवली केंद्र सरकारला घेरण्याची तयारी

नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर : अमेरिकेच्या वर्तमानपत्रामध्ये सौर ऊर्जा करारात कथित भ्रष्टाचाराची बातमी प्रकाशित झाल्यानंतर विरोधकांना आयतेच कोलित मिळाले आहे. आगामी २५ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात या मुद्यावरून विरोधकांनी सरकारला घेरण्याची तयारी चालवली आहे. यासंदर्भात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज, गुरुवारी संकेत देखील दिलेत.

काँग्रेसने या करारातील कथित भ्रष्टाचाराबाबत राहुल गांधी यांनी गौतम अदानी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट हल्लाबोल केला आहे. अदानीच्या अटकेसोबतच त्यांनी या प्रकरणाची संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) मार्फत चौकशीची मागणीही केली आहे. यासंदर्भात राहुल गांधी म्हणाले की, आम्ही हा मुद्दा उपस्थित करत आहोत. विरोधी पक्षनेता म्हणून हा मुद्दा मांडण्याची जबाबदारी माझी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या माणसाचे १०० टक्के संरक्षण करत आहेत. या माणसाने भ्रष्टाचार करून भारताची संपत्ती मिळवली आहे. अदानींचा भाजपला पाठिंबा आहे, आम्ही याचा पुनरुच्चार करू. जेपीसीमार्फत या प्रकरणाच्या चौकशीची मागणी हिवाळी अधिवेशनात करणार असल्याचे त्यांनी सांगितले. अदानींना अटक व्हावी ही आमची मागणी असल्याचे राहुल गांधी म्हणाले. पण आम्हाला माहित आहे की त्यांना अटक होणार नाही कारण भारताचे पंतप्रधान अदानींना पाठिंबा देतात, ते त्यांचे आश्रयदाते आहेत. हा मुद्दा संसदेत उपस्थित करणार असल्याचे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले. हा मुद्दा उपस्थित करून केंद्र सरकारवर दबाव आणण्यासाठी विरोधक सर्वतोपरी प्रयत्न करतील. विरोधकांच्या मतांकडे दुर्लक्ष केल्यास अधिवेशनात गदारोळ होण्याची शक्यता आहे. या गदारोळात घोषणाबाजीतून पंतप्रधान मोदींना लक्ष्य केले जाणार आहे.संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या रणनीतीबाबत इंडी आघाडीची बैठक होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

## विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती

अहिल्यानगर, दि.२१ - विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची मतमोजणी २२ नोव्हेंबर रोजी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पार पडणार आहे. यासाठी भारत निवडणूक आयोगातर्फे मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

अकोले विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक हौलिनलाल गौईटे (संपर्क अधिकारी - उर्ध्व प्रवरा उपविभाग कार्यकारी अभियंता प्रदिप हापसे - ७३५००७८८७७), संगमनेरसाठी सुनिल सिंग (संपर्क अधिकारी - उर्ध्व प्रवरा उपविभाग कार्यकारी अभियंता कैलास ठाकरे - ९४०४०७३७३९), शिर्डीसाठी कविथा रामू (संपर्क अधिकारी - सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे - ७२१८४८०३२२), कोपरगावसाठी शेरी (संपर्क अधिकारी - रचना सहायक किरण जोशी - ९८५०१७८७९५), श्रीरामपूरसाठी अरूण कुमार (संपर्क अधिकारी - मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलम - ८४२५९२४४३३) आणि नेवासा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून जे.एल.बी.हरि प्रिया (संपर्क अधिकारी - विस्तार अधिकारी बी.के.कासार - ७७७४०४७९७९) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शेवगाव विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून श्रीमती रंजिता (संपर्क अधिकारी - मुळा पाटबंधारे कार्यकारी अभियां सायली पाटील व धनश्री शिंदे- ९७६४५६४४५५), राहूरीसाठी केशव हिंगोनिया (संपर्क अधिकारी - सहायक प्राध्यापक आर.आर. निरगुडे - ७५८८६०४१५१), पारनेरसाठी सुरेंदर सिंग (संपर्क अधिकारी -कुकडी पाटबंधारे श्री.घोरपडे - ९२२५५४४३३१), अहमदनगर शहरसाठी ताय काये (संपर्क अधिकारी - सहायक अभियंता संदिप कुंभार - ९५५२१३४७८५), श्रीगोंदासाठी डी रथ्ना (संपर्क अधिकारी सहायक गटविकास अधिकारी विजय गायकवाड - ९०११८४५५२९, उपविभागीय अभियंता बबन वाळके - ९४२२३३५५१२, पुरवठा निरीक्षक - ८७८८४२०८५६) आणि कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून पुजा यादव (संपर्क अधिकारी - मुख्याधिकारी अजय साळवे - ८४८३८४८५३७, पुरवठा निरीक्षक वृषाली जाधव- ७३८७४०६९७२) यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती निवडणूक निरीक्षक समन्वयक अधिकारी दीपक दातीर यांनी दिली आहे.

## विद्यार्थ्यांच्या जातीप्रमाणपत्र पडताळणीसाठी २८ नोव्हेंबरपर्यंत विशेष मोहिम

छत्रपती संभाजीनगर,दि.२१ - शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विविध राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज निकाली काढण्यासाठी जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीमार्फत गुरुवार दि.२८ नोव्हेंबर पर्यंत विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे,असे जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य सचिव किशोर कुलकर्णी यांनी कळविले आहे.

या शिबिराचा लाभ खालील विद्यार्थी गट घेऊ शकता-

१. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग, एसईबीसी यासारख्या राखीव प्रवर्गातील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ११ वी किंवा १२ वी विज्ञान शाखेत प्रवेश असलेले विद्यार्थी. ज्यांना १२ वी नंतर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यावयाचे आहेत.

२. ज्या विद्यार्थ्यांना पदवीनंतर एम.बी.ए., एम.सीए.ए., एल.एल.बी. (तीन वर्ष), बी.एड. इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावयाचा आहे. ३. तंत्रनिकेत अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज केले आहेत व त्यांची प्रकरणे त्रुटी पूर्ततेअभावी प्रलंबित आहेत.

अशा विद्यार्थ्यांची प्रकरणे निकाली काढण्यासाठी ही विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. ही मोहिम गुरुवार दि.२८ नोव्हेंबर पर्यंत सुरु राहणार आहे. तरी विद्यार्थी व पालकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य सचिव किशोर कुलकर्णी यांनी केले आहे.

## आरोग्य विभागातर्फे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा

छत्रपती संभाजीनगर, दि.२१ - कुटुंब नियोजन ही बाब लक्षात घेता आरोग्य विभागाच्या वतीने आजपासून (दि.२१) ते बुधवार दि.४ डिसेंबर या कालावधीत पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा राबविण्यात येत आहे. पुरुष नसबंदी विषयी जनजागृती करणे, लोकांना पुरुष नसबंदीचे महत्व पटवुन देणे, स्त्रीयांप्रमाणे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्याची जबाबदारी ही पुरुषांची सुद्धा आहे, या विषयी माहिती देऊन समुपदेशन करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

हे अभियान दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात दि.२१ ते दि.२७ नोव्हेंबर दरम्यान लाभार्थ्यांशी संपर्क साधणे. त्यांना पुरुष नसबंदीचे महत्व पटवून देणे व प्रवृत्त करणे, योग्य जोडप्यांच्या याद्या तयार करणे.ज्यांनी यापुर्वी पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केली आहे.अशा लाभार्थ्यांमार्फत मोहीमेचा प्रचार व प्रसार करुन माहीती देण्यात येईल.

दुसऱ्या टप्प्यात दि.२८ नोव्हेंबर ते दि.४ डिसेंबर 'सेवा आठवडा' म्हणुन राबविण्यात येणार आहे. यामध्ये जिल्हा व तालुकास्तरीय लाभार्थ्यांचे शस्त्रक्रियेसाठी पूर्व नोंदणी करुन शिबिरे आयोजित करण्यात येतील. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार असुन लाभार्थ्यास १ हजार ४५१ रु. प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.या अभियानात जास्तीत जास्त पुरुषांनी नसबंदी शस्त्रक्रिया करुन घ्यावी,असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बाळकुष्ण लांजेवार यांनी केले आहे.

## इस्त्रायलच्या पंतप्रधानांविरोधात अटक वॉरंट

### युद्ध आणि मानवतेविरोधातील गंभीर आरोप

जेरुसलेम, २१ नोव्हेंबर : इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि माजी संरक्षण मंत्री योव्ह गॅलंट यांच्यावर इंटरनॅशनल क्रिमिनल कोर्टाने (आयसीसी) युद्ध गुन्हे आणि मानवतेविरुद्धच्या गंभीर आरोपांसाठी अटक वॉरंट जारी केले आहे. गाझा पट्टीत युद्धकाळात सामान्य नागरिकांना लक्ष्य करणाऱ्या हल्ल्यांसाठी आयसीसीने नेतान्याहू आणि गॅलंट यांच्यावर हत्या, शोषण आणि अमानवीय कृत्यांबद्दल गुन्हे दाखल केले आहेत. इस्त्रायलने गाझातील नागरिकांना अन्न, पाणी आणि वैद्यकीय सुविधा रोखल्यामुळे मोठ्या प्रमाणावर मृत्यू आणि संकटांना सामोरे जावे लागल्याचे आरोप आहेत. यात लहान मुलांचा मृत्यू आणि मानवीय त्रासाचे पुरावे आढळल्याचे कोर्टाने नमूद केले आहे. आयसीसीच्या अहवालानुसार, नेतान्याहू यांनी जाणूनबुजून सामान्य नागरिकांना लक्ष्य बनविले, याबाबतचे पुरेसे पुरावे उपलब्ध आहेत. दरम्यान, गाझातील युद्धबंदीबाबत कोणताही ठोस तोडगा निघालेला नाही. हमासचे गाझा प्रमुख खलील अल-हय्या यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत युद्धबंदी होत नाही, तोपर्यंत कैद्यांची अदलाबदल होणार नाही. अमेरिकेने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या विनाअट युद्धबंदी प्रस्तावावर व्हेटो लावला आहे. मात्र, ओलीसांची सुटका करणाऱ्या प्रस्तावाला अमेरिकेने समर्थन दिले आहे.

## अग्रलेख...

# जागतिक मैत्रीचे आणखी एक पाऊल

देशोदेशींच्या राष्ट्राध्यक्षांच्या भेटी घेण्याचा आणि तेथील भारतीय समुदायाशी संवाद साधत, उभय देशांचे संबंध दृढ करण्याचा भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सिलसिला सुरूच आहे. २०१४ मध्ये मोदींनी भारताचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर देशाच्या परराष्ट्र धोरणात इतके बदल केले की, कुण्या एकेकाळी जागतिक क्रमवारीत नोंदही न घेतल्या जाणाऱ्या या देशाच्या अर्थव्यवस्थेने पहिल्या पाचापर्यंत मजल मारली. आज जगाचा अग्रेसर म्हणून भारत मान्यता पावत आहे. देशात महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांमध्ये सुरू असलेला प्रचार सोडून पंतप्रधानांनी परवा नायजेरियाची राजधानी गाठली. या देशाचे राष्ट्रपती अहमद टिनुबू यांनी पंतप्रधानांना 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर' या सर्वोच्च राष्ट्रीय सन्मानाने पुरस्कृत केले. नायजेरियाचा सर्वोच्च सन्मान मिळविणारे पंतप्रधान मोदी हे दुसरे परदेशी व्यक्ती ठरले आहेत. त्यांच्या आधी ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ यांना १९६९ मध्ये हा सन्मान देण्यात आला होता. आतापर्यंत १५ देशांनी पंतप्रधान मोदींना त्यांच्या सर्वोच्च सन्मानाने गौरविले असून त्यांना मिळालेला हा १७ वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार आहे. हा सन्मान १४० भारतीयांना आणि भारत-नायजेरिया यांच्यातील घनिष्ठ मैत्रीला समर्पित करतो, असे मोदी म्हणाले. हा पुरस्कार आम्हाला दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी पुढे नेण्यासाठी प्रेरणा देत राहील, ही बाबही त्यांनी स्पष्ट केली. पंतप्रधानांचा नायजेरिया दौरा उभय देशांमधील संबंधांच्या दृष्टीनेच नव्हे, तर 'ग्लोबल साऊथ'साठी भारताच्या वचनबद्धतेचे पाऊल म्हणूनही महत्त्वाचा आहे. याआधी तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २००७ मध्ये अबुजाला भेट दिली होती. या भेटीनंतर १७ वर्षांनी मोदी या देशात पोहोचले. यावेळी भारत आणि नायजेरियामध्ये संरक्षण सहकार्यासह विविध मुद्यांवर धोरणात्मक भागीदारीची घोषणा करण्यात आली. दहशतवाद, अलिप्ततावाद, चाचेगिरी आणि अमली पदार्थांची तस्करी ही दोन्ही देशांसमोरील आव्हाने आहेत. गरिबी, प्रदूषण आणि लोकसंख्येची घनता या समस्यांचाही उभय देश सामना करीत आहेत. त्या आव्हानांचा एकत्रितरीत्या सामना करण्याबाबत या दौऱ्यात एकमत झाले. या भेटीदरम्यान झालेल्या करारानुसार भारतातर्फे नायजेरियातील पूरग्रस्तांसाठी २० टन धान्य पाठविले जाणार आहे. १९६० मध्ये ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने नायजेरियात शिक्षक आणि डॉक्टर पाठविले होते. तेथे सुमारे ६० हजार भारतीय स्थायिक झाले असून पूल बांधणारा समाज म्हणून त्यांची ख्याती आहे. सुमारे २०० भारतीय कंपन्यांनी नायजेरियात फार्मा, आरोग्य सेवा, कृषी आणि ऊर्जा या क्षेत्रांमध्ये अब्जावधींची गुंतवणूक केली आहे. जीडीपीच्या बाबतीत नायजेरिया आफ्रिकेतील आघाडीच्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. आता तो ब्रिक्सचा भागीदार देश आहे. भारताच्या प्रयत्नांमुळे पहिल्यांदा नायजेरिया जी-२० परिषदेत सहभागी झाला होता, ही बाब येथे सांगितली जायला हवी.

नायजेरियात राहणारे भारतीय दोन्ही देशांमधील महत्त्वाचा दुआ आहेत, असे प्रतिपादन देशाच्या राष्ट्रपतींसोबत झालेल्या भेटीदरम्यान मोदींनी केले आणि त्यांना येथे राहू दिल्याबद्दल तसेच त्यांची काळजी घेतल्याबद्दल त्यांनी नायजेरियाचे आभारही मानले. पंतप्रधान नायजेरियाची राजधानी अबुजा येथे पोहोचताच स्वतः राष्ट्रपतींनी विमानतळावर उपस्थित राहून त्यांचे केलेले स्वागत, या देशाच्या नेतृत्वाला मोदींबद्दल असलेली आपुलकी दर्शवून गेले. तेथे राजधानी अबुजाच्या चाव्या पंतप्रधानांकडे सुपूर्द करण्यात आल्या. आदर आणि विश्वासाचे हे प्रतीक म्हणावे लागेल. भारतीय समुदायाने विमानतळावर हातात तिरंगा घेऊन पंतप्रधानांचे स्वागत केले. यावेळी सरकारतर्फे गार्ड ऑफ ऑनर आणि २१ तोफांची सलामी मोदींना देण्यात आली. नायजेरियातील प्रसिद्धी माध्यमांनी या दौऱ्याला दिलेली प्रसिद्धी बघता, मोदींची भेट त्यांच्यासाठी किती महत्त्वाची होती हे दिसून येते. कोविड काळात भारताने नायजेरियाला सर्वप्रकारे मदत केली होती, ही बाब ध्यानात घेतली जायला हवी. तेल आणि वायूच्या प्रचंड साठ्यामुळे नायजेरिया हा आफ्रिकेतील एक महत्त्वाचा देश गणला जातो. भारताच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करणारा देश म्हणूनही नायजेरियाची ख्याती आहे. ऊर्जा, खाणकाम, औषधनिर्माण आणि माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये आफ्रिकेतील भारतीय गुंतवणूक सातत्याने वाढत आहे. मुत्सद्देगिरी आणि आर्थिक धोरणासाठी महत्त्वाच्या असलेल्या ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कंट्रीज आणि ऑर्गनायझेशन ऑफ ऑईल प्रोड्युसिंग कंट्रीजचा हा देश सदस्य आहे. नायजेरिया हा भारताचा आफ्रिकेतील सर्वात मोठा व्यावसायिक भागीदार आहे. माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, अटलबिहारी वाजपेयी आणि मनमोहन सिंग यांच्यानंतर या देशाला भेट देणारे नरेंद्र मोदी हे चौथे भारतीय पंतप्रधान आहेत. भारताने आफ्रिकन देशांच्या स्वातंत्र्याचे जोरदार समर्थन केले आहे. नायजेरियाच्या स्वातंत्र्यापूर्वीच दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांचा शुभारंभ झाला होता. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असून नायजेरिया हा आफ्रिकेतील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. नायजेरियाची लोकसंख्या २३ कोटी असून वेगाने विकसित होणाऱ्या देशांपैकी याचा समावेश होतो. उभय देशांच्या राष्ट्रप्रमुखांमध्ये झालेल्या विविध करारांमुळे विकासाचा एक नवा मार्ग खुला झाला आहे. पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रपती बोला अहमद टिनुबू यांच्यातील चर्चेत भारत-नायजेरिया धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यावर भर दिला गेला. उभय नेत्यांनी संरक्षण आणि सुरक्षेच्या मुद्यांवरही चर्चा केली. नायजेरियाला गिनीच्या आखातामध्ये महत्त्वपूर्ण आव्हानांचा सामना करावा लागत आहे, जिथे चाचेगिरी ही एक प्रमुख चिंता आहे. भारताने नायजेरियाच्या डिजिटल परिवर्तनासाठी, विशेषतः माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानात मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. आरोग्य सेवा व्यावसायिकांसाठी औषधांचा पुरवठा आणि क्षमता-निर्माण यासह आरोग्य सेवेमध्ये नायजेरियाला मदत करण्याची भारताने इच्छा व्यक्त केली. उभय देशांमध्ये विद्यार्थी आणि शैक्षणिक देवाणघेवाणीबाबत एकमत झाले असून त्यासंदर्भातील एका सामंजस्य करारावरही यावेळी स्वाक्षरी करण्यात आली. सांस्कृतिक देवाणघेवाणीबाबतच्या एका करारावरही या निमित्ताने हस्ताक्षर करण्यात आले. सीमा शुल्क प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी दोन्ही देशांमधील व्यापार अधिक कार्यक्षम बनवण्याचा निर्णय या दौऱ्यात झाला. सर्वेक्षण आणि भौगोलिक डेटा, पायाभूत सुविधांचा विकास आणि नियोजन यामध्ये सहकार्य वाढविण्याचाही विचार झाला. नायजेरियातील भीषण पुराच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी मानवतावादी दृष्टिकोनातून पूरग्रस्तांना २० टन धान्य पाठवणार आहेत. २०२२ भारत आणि नायजेरियादरम्यानचा व्यापार १५ अब्ज डॉलर इतका होता. त्यात आता वाढ झालेली आहे. नायजेरियाला भारताच्या प्रमुख निर्यातीत फार्मास्युटिकल्स, ऑटोमोबाईल्स, यंत्रसामग्री आणि रसायने यांचा समावेश होतो, तर नायजेरिया भारताला तेल आणि वायू उत्पादनांची निर्यात करतो. भारताने नायजेरियातील तेल आणि वायू क्षेत्रात गुंतवणूक करण्यास स्वारस्य दाखवले आहे. भारत नायजेरियामध्ये कृषी, उत्पादन आणि अक्षय ऊर्जा यासारख्या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या संधी शोधत आहे. या क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञान आणि गुंतवणूक आणण्यासाठी भारतीय कंपन्या सज्ज आहेत. भारताने नायजेरियाला १०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचे सवलतीचे कर्ज महत्त्वाच्या पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांच्या उभारणीसाठी दिले आहे. नायजेरियन व्यावसायिकांना स्थानिक क्षमता निर्माण करण्यातही भारत मदत करणार आहे. नायजेरियात मराठी भाषकांची संख्याही मोठी आहे. त्यांना संबोधित करताना मोदींनी मराठी लोकांच्या हृदयाला हात घातला. मराठी भाषकांनी यावेळी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल मोदींचे कौतुक केले. जागतिक परिस्थितीत नायजेरियाचे महत्त्व वाढलेले आहे. तथापि, भारताच्या या दौऱ्यांना पाकिस्तानची चुळबूळ वाढली आहे. पाकिस्तानी नेतृत्वाला मोदींचा हा दौरा खुपत आहे. येत्या काळात विविध करारांच्या माध्यमातून नायजेरिया भारताच्या अधिक जवळ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या दौऱ्याच्या निमित्ताने आणखी एका देशाशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करण्यासोबतच मोदींनी जागतिक शांततेच्या दृष्टीने आणखी एक खंबीर पाऊल टाकले आहे.

## इतस्ततः

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इस्लाम

**डॉ. विवेक राजे**

या देशात कोणत्याही प्रदेशात विधानसभा किंवा लोकसभेची निवडणूक लागली की, सगळ्या राजकीय पक्षांना आणि त्यांच्या अधिकृत, अनधिकृत, स्वयंघोषित प्रवक्त्यांना अचानक अनेक गोष्टी आठवायला लागतात. अनेकदा अशा अनेक गोष्टींना कागदोपत्री, ऐतिहासिक असा आधार असतो. अनेकदा असा आधार नसतो. अनेकदा ऐतिहासिक सत्याचा अपलाप केला जातो. अनेकदा ऐतिहासिक घटना वा कागदपत्रांच्या विश्लेषणाला अथऐवजी अनर्थाचे स्वरूप येते. हे सगळं करण्यात डाव्या विचारसरणीच्या लोकांचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात काही मुसलमान काही काळ होते. ते का होते, किती काळ होते यासारख्या गोष्टींचा विचार न करता, हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे 'गोब्राह्मण प्रतिपालक' अशी उपाधी असलेल्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सेक्युलर वा सेक्युलॅरिझम वगैरे संकल्पनाही अस्तित्वात नसलेल्या काळातील छत्रपती शिवाजी महाराजांना चक्क सेक्युलर ठरवण्याचे कौशल्य फक्त डाव्या विचारसरणीच्या लोकांनाच अवगत असल्याचे दिसते. अशाच प्रकारची एक मल्लिनाथी कुणा एका मुस्लिम मौलवींनी केली आहे आणि ती सगळीकडे वादाचा विषय झालेली दिसते. हा मुस्लिम मौलवी असे सांगतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा बौद्ध धर्माची दीक्षा घेण्याची घोषणा केली तेव्हा त्यांना मुस्लिम धर्मात प्रवेश करण्याचे आमंत्रण देण्यात आले होते. तेव्हा थोडक्यात चुकले; नाही तर आज 'भीम-मीम'ची घोषणा देण्याची गरजच पडली नसती. निवडणुकांच्या रणधुमाळीत अनेक नॅरेटिव्हज पसरविले जातात. या नॅरेटिव्हजचा घडलेल्या इतिहासाशी वा भविष्याशी काहीही संबंध नसतो. वास्तविक, भारतातील बौद्ध पंथाच्या ऱ्हासाची कारणे देताना डॉ. आंबेडकर स्वतः असे म्हणतात की, मुस्लिम आक्रमकांनी बौद्ध धर्मीयांच्या सरसकट केलेल्या कत्तली, ऐहिक जीवनाविषयीची उदासीनता आणि जगभरात प्रसार करण्याच्या प्रयत्नात प्रांतिक स्तरावर केंद्र स्थापित केले न जाणे, ही महत्त्वाची कारणे होत. म्हणजे बौद्ध धर्माच्या ऱ्हासासाठी डॉ. आंबेडकरांच्या मते हिंदू धर्म कारणीभूत नव्हता. बाबासाहेब आंबेडकरांच्या धनंजय किर लिखित चरित्रातील पुढील काही संदर्भ इस्लामच्या बाबतीतील बाबासाहेबांच्या विचारांचा मागोवा घेण्यासाठी पुरेसे आहेत.

''राज्यघटना तयार करून देशाला अर्पित केल्यानंतर डॉ. आंबेडकरांचा घटनेचे शिल्पकार म्हणून भारतभरात गौरव केला गेला. त्यावेळी त्यांनी त्यांच्या लोकांना 'सर्व देशाचे हित आणि उन्नती या दृष्टीने विचार करावा' असा उपदेश केला.'' देशाचा विचार याचा अर्थ सर्व देशांतील लोकांच्या उन्नतीचा विचार. असा विचार करणारा आणि उपदेश करणारा माणूस या देशाच्या रास्त परंपरा, संस्कृती, विविधता, स्वातंत्र्य यांचा बळी देऊन एकारलेले तत्त्वज्ञान सांगणाऱ्या संस्कृती आणि श्रद्धा आमच्यावर लादण्याचा सातत्याने सशस्त्र प्रयत्न करणाऱ्या इस्लामचा विचार कधीही करणार नाहीत. दिल्लीत एका सभेत बोलताना ते म्हणाले की, ''बुद्धाखेरीज सर्व धर्म संस्थापकांनी आपण मोक्षदाते आहोत, ही भूमिका घेतली आणि स्वतः स्खलनातीत आहोत, अशी ग्वाही दिली. उलटपक्षी बुद्धाने आपल्याकडे मार्गदर्शकाची भूमिका पत्करली.'' याचा अर्थ बाबासाहेबांना 'मोक्ष' ही संकल्पना मान्य आहे. मोक्ष प्राप्तीसाठी असलेले विविध मार्गदेखील त्यांना मान्य आहेत तसेच या मार्गाच्या निवडीचे स्वातंत्र्य त्यांना अभिप्रेत होते. मार्ग ज्याचा त्याने निवडायचा असतो, कोणीही मोक्षदाता असत नाही, असे त्यांचे मत होते. मग जे धर्म आणि त्यांचे प्रेषित 'जन्नत' आणि 'कयामत की रात', 'पाप पुण्याचा निवाडा' आणि 'आम्ही सांगतो तोच मार्ग' असा अतिरेकी अट्टाहास करणाऱ्या कोणत्याही धर्मात प्रवेश करण्याचा विचार कसे काय करू शकतील, याचा लोकांनी विचार केला पाहिजे. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेस आपण नागपूर येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेणार असल्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घोषणा केली. त्या आधी, म्हणजे १३ ऑक्टोबर १९५६ च्या संध्याकाळी, पत्रकारांशी वार्तालाप करताना, एका प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणाले की, ''अस्पृश्यांच्या प्रश्नावर गांधीजींशी चर्चा करताना मी त्यांना म्हणालो की, अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधी तुमच्याशी माझे मतभेद असले, तरी वेळ येईल तेव्हा मी देशाला कमीत कमी धोका लागेल, असा मार्ग स्वीकारेन. म्हणून बौद्ध धर्म स्वीकारून मी या देशाचे जास्तीत जास्त हित साधत आहे. कारण बौद्ध धर्म हा भारतीय संस्कृतीचाच एक भाग आहे. या देशाची संस्कृती, इतिहास यांच्या परंपरेला धोका लागणार नाही, अशी मी खबरदारी घेतली आहे.'' भारतीय लोक, संस्कृती, परंपरा यांच्या विषयीची पोटातून कळकळ असलेला माणूस या सगळ्या गोष्टींना धोका निर्माण करण्याचा विचारही करू शकत नाही. डॉ. आंबेडकर काँग्रेस व गांधींच्या मुस्लिम तुष्टीकरण धोरणाचा संदर्भ देऊन असे लिहितात की, ''गांधींनी मुस्लिमांना हिंदूंच्या विरुद्ध गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषी असतानाही, कधीही दोष दिला नाही वा जाब मागितला नाही.'' स्वामी श्रद्धानंद आणि इतरांच्या हत्येचा हवाला देत डॉ. आंबेडकर लिहितात की, ''किती हिंदूंची हत्या झाली आहे, हे महत्त्वाचे नसताना, मुस्लिम धर्मातील मुखंडांनी या कृत्यांचा कधीही निषेध केला नाही.'' ते लिहितात की, ''गांधींनी मोठ्या प्रमाणातील मोपला हिंसाचाराला जेव्हा ते म्हणाले की, धाडसी देवभिरू मोपला; ज्याला ते धर्म मानतात आणि ज्याला ते धार्मिक मानतात त्यासाठी लढत होते. हिंदूंमध्ये धैर्य आणि विश्वास असणे आवश्यक आहे. असा धर्मांध उद्रेक होऊनही ते म्हणजे हिंदू आपल्या धर्माचे रक्षण करू शकतात असे वाटते, तेव्हाच माफ केले होते. जे बाबासाहेब गांधींच्या मुस्लिमधार्जिण्या धोरणावर थेट टीका करतात आणि टीका करताना इस्लाममधील विकृतीवर कटाक्ष टाकतात ते कधीतरी इस्लाम धर्मात प्रवेश करण्याचा विचार करतील, असे वाटत नाही. देशाच्या फाळणीच्या वेळी गांधीजींच्या, इथल्या मुसलमानांनी इथेच म्हणजे भारतातच राहावे आणि पाकिस्तानातील हिंदूंनी पाकिस्तानातच राहावे, या घोषणेला वा आग्रही प्रतिपादनाला झडझडून विरोध करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण लोकसंख्येची सुनियोजित अदलाबदल करण्याची सूचना केली होती. तेव्हाही भारतातील मुस्लिम सुरक्षित राहतील, पण पाकिस्तानातील हिंदूंच्या सुरक्षिततेला निश्चित धोका निर्माण होईल, याची त्यांना खात्री होती. त्यामुळेच ते लोकसंख्येच्या अदलाबदलीच्या प्रतिपादनावर शेवटपर्यंत ठाम राहिले. इस्लामची आक्रमकता, त्या धर्मातील दार-अल-इस्लाम आणि दार-अल-हरब या संकल्पना तसेच फक्त मोमिनांनाच जीवित राहण्याचा असलेला हक्क हे माहिती असल्याने तसेच स्वप्नाळू राजकारण न करता व्यवहारी दृष्टिकोन असलेले ते राजकारणी असल्यामुळे तेथील हिंदूंच्या सुरक्षिततेची त्यांना वाटणारी कळकळ त्यांच्या सूचनेमधून सहजपणे लक्षात येते. मुस्लिम समाजातील स्त्रियांची स्थिती, पर्दा विषय, इस्लाममध्ये नसलेले उपासना स्वातंत्र्य व स्त्रियांची गुलामगिरी याबाबत डॉ. आंबेडकरांनी उल्लेख केलेला आहे. ते लिहितात, मुसलमानांना राजकारणात रस नाही. त्यांचे प्रमुख स्वारस्य धर्म हेच आहे. मुस्लिम मतदार, उमेदवाराचा कार्यक्रम तपासण्याची पर्वा करत नाही. मतदाराला उमेदवाराकडून एवढीच इच्छा आहे की, त्यांनी मशिदीचे जुने दिवे बदलून नवीन दिवे लावावेत, मशिदीसाठी नवीन चटई द्यावी किंवा मशिदी जीर्ण झाल्यामुळे त्याची दुरुस्ती करावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या देशहिताची तळमळ असलेल्या माहात्म्याविषयी सत्याचा अपलाप करणे म्हणजे, केवळ संख्यात्मकदृष्ट्या वरचढ ठरण्यासाठी, निवडणुकांमध्ये विजय मिळवून इस्लामधार्जिणे कायदे तयार करून घेण्यासाठी सगळ्या जगाला (अल तकिया) धोका देत, दलित-मुस्लिम ऐक्याच्या नावाखाली इस्लामी वर्चस्ववादी जमावाच्या संगनमताने डाव्या मीडियाने रचलेला खोटेपणा होय.

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# शाब्बास गडचिरोली प्रशासन!

गडचिरोलीची भौगोलिक परिस्थिती आणि माओवाद्यांच्या दहशतीचे सावट या पृष्ठभूमीवर मतदानासाठी ठरवून दिलेला दुपारी ३ वाजेपर्यंतचा वेळ, अशा परिस्थितीत लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यासाठीचे आव्हान, गडचिरोलीच्या जिल्हा प्रशासनाने लिलया पेलले आहे. चार महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत प्रशासनाने दाखविलेली कार्यतत्परता बघून खुद्द निवडणूक आयोगाने गडचिरोली प्रशासनाची पाठ थोपटली आहे. अतिशय अडचणींचा सामना करीत जर गडचिरोलीत ७२ टक्क्यांहून अधिक मतदान होत असेल तर इतर जिल्ह्यांमध्ये मतदानाची टक्केवारी गडचिरोलीपेक्षा अधिक असायला पाहिजे. गडचिरोलीचा आदर्श संपूर्ण राज्याने घेण्याची गरज आहे. मात्र, दुर्दैवाने राज्याच्या इतर जिल्ह्यांतील नागरिक मतदान करायला पुढे येत नाहीत आणि टक्केवारी कमी होते. लोकशाहीचा हा उत्सव साजरा करायला सरकारद्वारे मिळणारी सुटी सहलीसाठी साजरे करणारे महाभाग बघितल्यावर खरचं चिड येते. मतदान करायला मध्यमवर्गीय पुढे येत नाहीत, हे अनेकदा सिद्ध झाले आहे. मतदानाचे आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी मुळात जागृती करावे लागणे, हेच अतिशय दुर्दैव आहे. या उत्सवासाठी प्रशासनाकडून लाखो रुपये खर्च केले जातात. निवडणूक आयोगाचे अधिकारी संपूर्ण महिनाभर डोळ्यात तेल घालून लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यासाठी जिवाचा आटापिटा करतात. एकेका मतदाराचे मतदान



करवून घेण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करतात. अहोरात्र झटतात, मात्र इतके सगळे करूनही मतदारांची टक्केवारी शहरी भागात वाढताना दिसत नाही. या सगळ्यांना मध्यमवर्गीय मतदार कारणीभूत आहेत, हेच दिसून आले आहे. गरीब मतदार मात्र आपला हक्क कसेही करून बजावतात आणि आपले कर्तव्य पार पाडतात. गडचिरोली जिल्ह्यात मतदारांचा हा उत्सव साजरा करण्यासाठी प्रशासनापुढे मोठे आव्हान आहे. मात्र, तरीदेखील एकेका मतदारांसाठी जिल्हा प्रशासन झटते आणि त्यांचे मतदान करवून घेते. यासाठी गडचिरोलीच्या जिल्हा प्रशासनाचे खरंच कौतुक करण्यासारखे आहे. काही ठिकाणी पोहोचायला दोन दिवस पायपीट करून जावे लागते. जवळपास ३४ किलोमीटरचा पायी प्रवास करून पोलिस जवान व प्रशासनाचे अधिकारी-कर्मचारी मतदानाची प्रक्रिया पूर्ण करून एकेका मतदाराचे मतदान करवून घेतात, हे खरंच वाटते तितके सोपे काम नाही. गडचिरोली जिल्ह्यात ३६७ अतिसंवेदनशील मतदान केंद्रे आहेत. या ठिकाणी माओवाद्यांचे सावट असते. असे असतानाही जंगलातून कुडकुडत्या थंडीत पायी प्रवास करून मतदान पथके गावागावांत पोहोचले. कुठल्याही परिस्थितीत या उत्सवात अडचणी येऊ नये म्हणून पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी उभारलेला कडक बंदोबस्त हासुद्धा तितकाच प्रशंसनीय आहे. संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात १६ हजार सुरक्षा जवानांचा फौजफाटा मतदान केंद्रांवर तैनात करण्यात आला होता. त्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यात आले होते. माओवाद्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी १३० ड्रोनसह सुसज्ज अशी टिम तयार करण्यात आली आहे; जी आकाशातूनही माओवाद्यांवर पाळत ठेवेल. ७५० किलोमीटरचे रोड ओपनिंग अभियान पोलिसांनी आधीच करून ठेवले असून मतदान पथकांना कुठल्याही प्रकारच्या अडचणी येऊ नये, याची खबरदारी पोलिसांकडून घेतली जात आहे. पोलिस दलाच्या मदतीला गडचिरोलीत वायुसेनेचे तीन आणि भारतीय लष्करांचे दोन आणि गडचिरोली पोलिस दलाचे दोन असे सात हेलिकॉप्टर गडचिरोलीत तैनात करण्यात आले आहेत. या हेलिकॉप्टरच्या साहाय्याने गडचिरोलीच्या संवेदनशील व अतिसंवेदनशील ठिकाणी मतदान कर्मचाऱ्यांना पाठविण्यात आले आहे. ६५० मतदान कर्मचाऱ्यांना १५३ मतदान केंद्रांवर पोलिसांनी सुरक्षिततरीत्या हेलिकॉप्टरच्या साहाय्याने पोहोचविले आहे. अतिशय दुर्गम व अडचणींच्या ठिकाणी जिथे हेलिकॉप्टरनेसुद्धा पोहोचणे शक्य नाही, अशा ठिकाणी मतदान पथकाला पायी जंगलातून पोहोचवून जवान आपले कर्तव्य बजावत आहेत. मग असे असताना केवळ मतदान केंद्रापर्यंत पोहोचून मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी आपण जात नसू तर हे किती दुर्दैवी आहे?

९९२२९९९५८८


## दिल्ली वार्तापत्र

# आता लक्ष दिल्ली विधानसभा निवडणुकीकडे...

**श्यामकांत जहागीरदार**

महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीचे मतदान आटोपले असून आता नवीन वर्षात दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी फेब्रुवारी महिन्यात मतदान होणार आहे. दिल्लीतील निवडणुका जाहीर व्हायला अद्याप उशीर आहे; मात्र सर्व राजकीय पक्ष युद्धपातळीवर कामाला लागले आहेत. दिल्लीत राजकीय हालचालींना आणि पक्षांतराला वेग आला आहे. दिल्लीत गेल्या जवळपास १२ वर्षांपासून आपची सत्ता आहे. लोकसभा निवडणुकीत दिल्लीतील सर्व म्हणजे सातही जागा जिंकणाऱ्या भाजपाला आतापर्यंत दिल्ली विधानसभेची निवडणूक जिंकता आलेली नाही. काँग्रेसची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. दिल्लीत काँग्रेसची सलग १५ वर्षे सत्ता होती. शीला दीक्षित मुख्यमंत्री होत्या, पण गेल्या १० वर्षांत दिल्ली विधानसभेत काँग्रेसला आपले खातेही उघडता आले नाही. त्यामुळे भाजपा आणि काँग्रेस आपकडून दिल्ली विधानसभेची सत्ता हिसकण्यासाठी जिद्दीने कामाला लागले आहेत.

२०१५ आणि २०२० च्या निवडणुकीत आपला लक्षणीय यश मिळाले. पण आपला यावेळी सत्तेची हॅटट्रिक करता येईल, असे वाटत नाही. दिल्ली विधानसभा निवडणुकीत खरी लढत आप, भाजपा आणि काँग्रेस अशा तीनही राष्ट्रीय पक्षांत आहे. भाजपा आणि काँग्रेस यांची लढत आपशी राहणार आहे, तर आपला आपली सत्ता कायम ठेवण्यासाठी भाजपा आणि काँग्रेस अशा दोन पक्षांशी लढावे लागणार आहे. विशेष म्हणजे २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत आपची जेवढी ताकद होती, तेवढी आता राहिलेली नाही. आपचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा जो करिश्मा होता, तोही आता ओसरत चालला आहे. भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून जन्म झालेल्या आपच्या अनेक नेत्यांना नंतर भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात जावे लागले. यातून मुख्यमंत्री असलेले केजरीवाल आणि उपमुख्यमंत्री राहून चुकलेले मनीष सिसोदियाही सुटले नाही. साध्या राहणीचा डिंढोरा पिटणाऱ्या केजरीवाल यांनी मुख्यमंत्री निवासस्थानाच्या सौंदर्यीकरणावर म्हणजे आपल्या शीशमहालावर केलेला कोट्यवधी रुपयांच्या खर्चामुळे त्यांचा खरा चेहरा जनतेसमोर आला. त्यामुळे केजरीवाल यांचे पायही मातीचे असल्याची जनमानसाची धारणा झाली आहे. त्यामुळे दिल्लीच्या जनतेचा केजरीवाल यांच्याबद्दल पूर्ण भ्रमनिरास झाला आहे. राजकारणात आपली साधूची प्रतिमा निर्माण करणारे केजरीवाल हे संधिसाधू असल्याची जनतेची खात्री पटली. जवळपास १० वर्षे दिल्लीचे मुख्यमंत्रिपद भूषविलेल्या केजरीवाल यांची भ्रष्टाचाराच्या आरोपात तुरुंगात जाण्याच्या आधीच



प्रशासन आणि पक्षावरची पकड सुटली होती. आता तर त्यांनी आपवरची आपली पकड पूर्णपणे गमावली आहे, असे दिसते. तसे नसते तर दिल्लीच्या महापौर पदाच्या निवडणुकीत आपची १० मते फुटली नसती. आपच्या १० नगरसेवकांनी भाजपा उमेदवाराला मतदान केले. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या आधी आपचे आणखी १०-१२ आमदार आणि मोठ्या संख्येतील नगरसेवक आपचा राजीनामा देत भाजपात आले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. दिल्लीचे परिवहन मंत्री कैलास गहलोत यांनी मंत्रिमंडळाचा तसेच आपचा राजीनामा दिल्यामुळे यावर शिक्कामोर्तब झाले. गहलोत यांनी भाजपात प्रवेश केल्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आपला मोठा धक्का बसला आहे. गहलोत यांनी राजीनामा देताना भ्रष्टाचार आणि शीशमहालाच्या मुद्यावरून केजरीवाल यांना चांगलाच घरचा अहेर केला. त्यामुळे केजरीवाल यांची दातखीळ बसली. गहलोत यांच्या राजीनाम्यावर कोणतीही प्रतिक्रिया केजरीवाल यांनी दिली नाही. आपच्या मंत्रिमंडळातून राजीनामा देणारे गहलोत हे पहिले मंत्री नाही. याआधी राजकुमार आनंद यांनीही राजीनामा दिला होता. कपिल मिश्राही केजरीवाल मंत्रिमंडळातून राजीनामा देत भाजपात आले होते. केजरीवाल यांनी सत्तेसाठी आपच्या स्थापनेत सहभाग असलेल्या अनेक जुन्या-जाणत्या नेत्यांचा विश्वासघात केला. केजरीवाल यांनी आपले राजकीय गुरू अण्णा हजारे यांनाही सोडले नाही. तेथे अन्य नेत्यांचे काय? आपमध्ये केजरीवाल यांच्याविरुद्ध सर्वात पहिले आवाज उठवला तो विनोदकुमार बिन्नी यांनी. २०१३ मध्ये आपल्याला मिळालेल्या खात्याविरुद्ध बिन्नी यांनी नाराजी प्रकट केली. त्याची परिणती त्यांच्या मंत्रिमंडळातून हकालपट्टी झाली. बिन्नी यांनी नंतर भाजपात प्रवेश केला.

अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात सहभागी असलेले अनेक नेते सुरुवातीला केजरीवाल यांच्यासोबत होते. आपची स्थापना करण्यात हे सर्व नेते केजरीवाल यांच्यासोबत होते. पण नंतर यातील एकेकाला केजरीवाल यांनी पक्षातून बाहेर काढले वा हे नेतेच केजरीवाल यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून आपमधून बाहेर पडले. यात ज्येष्ठ विधिज्ञ शांतिभूषण, त्यांचाच मुलगा प्रशांतभूषण, योगेंद्र यादव, किरण बेदी, कुमार विश्वास, आनंदकुमार, मयंक गांधी, अंजली दमानिया, आशुतोष, आशिष खेतान आदी नेते होते. आशुतोष तर एका वृत्तवाहिनीत मोठे पद सोडून केजरीवाल यांच्यासोबत आले होते. प्रशांतभूषण, योगेंद्र यादव यांनी नंतर शेतकऱ्यांच्या मुद्यावर आवाज उठवण्यासाठी 'स्वराज अभियान'ची स्थापना केली. शांतिभूषण यांनी स्थापनेच्या वेळेला आपला एक कोटी रुपयांची देणगीही दिली होती. किरण बेदी यांचा तर केजरीवाल आपली मोठी बहीण असा उल्लेख करीत होते. पण पुढे हे नेते आपल्याला आव्हान देतील, मुख्यमंत्रिपदाचे दावेदार होतील, अशी भीती वाटल्यामुळे केजरीवाल यांनी या नेत्यांना पक्षात राहू दिले नाही. या नेत्यांनी राजीनामे देऊन बाहेर जावे, अशी परिस्थिती निर्माण केली. केजरीवाल यांनी आपल्या भोवती फक्त खूशमस्करे नेतेच ठेवले, जे केजरीवाल यांच्या हो ला हो म्हणतील, त्यांच्या तालावर नाचतील.

राजकारणाचे शुद्धीकरण करण्याच्या नावाखाली नव्या पक्षाची स्थापना करणाऱ्या केजरीवाल यांनी नंतर साधनशूचितेचा तसेच नैतिकतेच्या राजकारणाचा त्याग केला. त्यामुळे एकामागोमाग एक असे जुने सहकारी त्यांना सोडून चालले. त्यामुळे दिल्ली विधानसभेची यावेळची निवडणूक केजरीवाल यांच्यासाठी अडचणीची आहे. राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळालेल्या आपचे दिल्ली विधानसभा निवडणुकीत पानिपत झाल्याशिवाय राहणार आहे. राजधानी दिल्लीला लागून असलेल्या हरयाणा विधानसभा निवडणुकीत आपला सत्ता मिळवणे तर दूर; पण एकही जागा जिंकता आली नाही. त्यांच्या सर्व उमेदवारांची जमानत जप्त झाली. केजरीवाल यांचा प्रभाव ओसरल्याचा तसेच त्यांची राजकारणातील उपयोगिता संपल्याचा हा एक संकेत होता. दिल्ली विधानसभा निवडणुकीत त्याचे पुन्हा प्रत्यंतर आल्याशिवाय राहणार नाही.

९८८१७१७८१७

### पुरेसा पाणीपुरवठा करा

राज्यात यंदा पाऊस सरासरीपेक्षा जास्त पडल्याने बहुतांश धरणे ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत भरली. राज्यातील कोयना, जायकवाडी, उजनी आदी मोठी धरणे गेल्या काही वर्षांत शंभर टक्के भरल्यामुळे अनेक जिल्ह्यांतील नागरिकांची पाण्याची चिंता मिटली. ही धरणे सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच शंभर टक्के भरल्याने कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची चिंता भेडसावणार नाही, असे वाटते. मुबलक प्रमाणात पाणी मिळणे हा नागरिकांचा अधिकारच आहे, तर त्यांना आवश्यक प्रमाणात पाणीपुरवठा करणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. त्यामुळे सध्याच्या शंभर टक्के धरणे भरली असली, तरी पुढील वर्षी मे-जन महिन्याच्या अखेरपर्यंत सरळीतपणे पाणीपरवठा जलवाहिन्यांमधून पाणी चोरी होणे आदी सर्व प्रकारही सुरळीतपणे पाणीपुरवठा न होण्यामागील मुख्य कारणे आहेत. सुरळीतपणे पाणीपुरवठा न होण्यामागे या कारणांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सुरळीतपणे पाणीपुरवठा होण्यासाठी सर्वात आधी जुन्या आणि गळक्या जलवाहिन्या बदलण्यासाठी अधिक प्राधान्य देण्याची गरज आहे. कारण, अशा जलवाहिन्यांमधून होणारी पाणी गळतीची समस्या ही फार मोठी असून वर्षानुवर्षे यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत आहे. त्यामुळे जुन्या आणि गळक्या जलवाहिन्या बदलून त्या ठिकाणी नव्या जलवाहिन्या टाकण्याची गरज आहे. त्याशिवाय जलवाहिन्या फुटण्यासारखे प्रकार रोखण्यासाठीही प्रयत्न करणे तितकेच गरजेचे आहे. कारण एकदा का जलवाहिनी फटली तर लाखो लिटर पाण्याचा अपव्यय रोखता

## वाचक पत्रे

असते. दरवर्षी अपुऱ्या उपलब्ध पाणीसाठा तोकडा असल्याचे कारण पुढे करण्यात येते. परंतु यंदा मात्र काही अशी परिस्थिती नाही, असे वाटते.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### वाडी चौकातील समस्या

भरपूर आहे आणि वाहतूक खोळंब्याची समस्या कायम आहे. त्या भागातील वाढलेली वस्ती, वाडी परिसरात असलेले मोठमोठे गोडावून, एमआयडीसी भागातील कंपन्या यामुळे मोठमोठ्या वाहनांची ये-जा मोठ्या प्रमाणावर होत असते. तरी या समस्येवर समाधान काढून नागरिकांना दिलासा मिळावा, ही संबंधितांकडून अपेक्षा. वाडी आणि एमआयडीसी परिसरात येणाऱ्या मोठ्या वाहनांसाठी एखादा हब तयार करून तेथे माल उतरविण्यात आला आणि लहान वाहनांनी तो माल संबंधितांपर्यंत पोहोचविण्यात आला किंवा कॉरिडोर तयार करण्यात आला तर या समस्येवर मोठ्या प्रमाणावर समाधान मिळविता येईल, असे वाटते.

**पुरुषोत्तम मेश्राम**/नागपूर

बसल्या एका क्लिकवर मोठमोठी कामे करता येतात. या तंत्रज्ञानाचा उपयोग करून मतदार यादी अपडेट करण्याचे काम केले जावे, त्यासाठी मतदार यादी जन्म-मृत्यूची नोंद करणाऱ्या कार्यालयाशी लिंक करावी. एखाद्याचा जन्म झाल्यानंतर त्याची नोंद निवडणुकीच्या लिंकला आपोआप दिली जावी आणि ती व्यक्ती १८ वर्षांची झाली की तिचे नाव मतदार यादीत जोडले जावे तसेच एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याची नोंद झाल्यावर त्या व्यक्तीचे नाव मतदार यादीतून वगळले जावे. असे केल्यास एका व्यक्तीचे नाव एकाच ठिकाणी येईल. त्यामुळे ती व्यक्ती देशात कुठेही वास्तव्याला असली तर तिला मतदानाचा अधिकार दिला जावा. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जर मतदार याद्या अद्ययावत केल्या तर नाव वगळले गेले. गेल्या वेळी होते आता नाही. खप वर्षे झाले माझे आजोबा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## इति-उवाच...



नीलेश आणि नितेश दोघेही मोठ्या मताधिक्याने विजयी होतील. माझी दोन्ही मुले मंत्री झाली, तर माझ्यासारखा भाग्यवान कुणी नाही. ईश्वराच्या कृपेने तसे घडले, तर चांगलेच आहे.

**नारायण राणे,** भाजपाचे नेते



अजित पवार यांच्यावर काय अन्याय झाला आहे? सत्ता त्यांच्या हातात आहे. अनेकवेळा ते राज्याचे उपमुख्यमंत्री राहिले आहेत. युगेंद्र पवार तरुण असून, त्याच्याकडे अद्याप कोणते राजकीय पद नाही, त्यामुळे अन्याय कोणावर व कोणाकडून झाला?

**शरद पवार,** राकाँशप



मलबार हिलवरील स्त्री आणि पुरुष आज मतदान करणार नाहीत. कारण, त्यांच्या मर्सिडीज आणि बीएमडब्लू या आलिशान गाड्यांचे चालक त्यांचे वाहन मतदान केंद्रापर्यंत नेऊ शकतील की नाही, यावर त्यांचा वाद सुरू असेल. मतदान केंद्रावर जाताना त्यांचे महागडे, डिझायनर बूट खराब होण्याची शक्यता आहे.

**हर्ष गोयंका,** उद्योगपती



रामराजे यांना आमदार केल्याचे सांगितल्यानंतर ते पवार साहेबांना खटकले. ते म्हणाले, हा उद्या म्हणेल की बारामतीचा आमदारही मीच केला. पण मी तसे म्हणणार नाही. मी एवढा वेडा नाही. पवार साहेब आमदार झाले तेव्हा मी तिसरीत होतो. मग तिसरीतील कार्ट कसे कुणाला आमदार करेल.

**अजित पवार,** राष्ट्रवादी काँग्रेस

# विरोधकांच्या हॉटेलमध्ये पैसे वाटण्याइतका मूर्ख नाही

### विनोद तावडे यांनी आरोप फेटाळले

◆ **मुंबई, २१ नोव्हेंबर**

मतदारांना आकर्षित करण्यासाठी पैसे वाटप केल्याचा आरोप फेटाळून लावतानाच, मला नियमांची चांगली जाण आहे आणि राजकीय विरोधकांच्या हॉटेलमध्ये पैसे वाटण्याइतका मी मूर्ख नाही, असे भाजपाचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी बुधवारी सांगितले.

विधानसभा निवडणुकीच्या काही तास आधी, बहुजन विकास आघाडीचे (बीव्हीए) नेते हितेंद्र ठाकूर यांनी मंगळवारी तावडेंवर मतदारांना आकर्षित करण्यासाठी मुंबईपासून ६० किमी अंतरावर असलेल्या विरारमधील एका हॉटेलमध्ये पाच कोटी रुपये वाटल्याचा आरोप केला.



पाच कोटी रुपये रोख वाटल्याच्या दाव्याच्या दरम्यान, हॉटेलच्या खोल्यांमधून ९.९३ लाख रुपये रोख जप्त करण्यात आले, असे मंगळवारी एका निवडणूक अधिकाऱ्याने सांगितले.

पैसे वाटल्याचा आरोप विनोद तावडे यांनी फेटाळून लावला. मी केवळ निवडणूक प्रक्रियेबद्दल पक्ष कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत होतो. विवांता हॉटेल हितेंद्र ठाकूर यांच्या मालकीचे आहे. त्यांच्या हॉटेलमध्ये जाऊन तेथे पैसे वाटेन, इतका मी मूर्ख नाही, असे तावडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

मी ४० वर्षांपासून राजकारणात आहे आणि प्रचार शांत झाला असताना काय करावे याची मला चांगली माहिती आहे. मी कार्यकर्त्यांशी अनौपचारिक गप्पा मारत होतो. मी प्रचार करीत नव्हतो, असे तावडे म्हणाले.

या प्रकरणी विरोधी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी निवडणूक आयोगाकडे सर्वंकष चौकशीची मागणी केली आहे. या प्रकरणामध्ये राष्ट्रीय नेते गुंतल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करून तावडे म्हणाले, भाजपाचे लोक आता विरोधी पक्षांच्या मालकीच्या हॉटेलमध्ये पैसे वाटतील इतके मूर्ख राहिलेले नाहीत. त्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे. त्याच्याकडे एकही पैसा सापडला नसल्याचा पुनरुच्चार करून तावडे म्हणाले, राहुल गांधी आणि सुप्रिया सुळे यांनी जे पाच कोटी रुपये पाहिले, ते कृपया मला पाठवा. ते माझ्या बँक खात्यात जमा करू शकतात.

पालघरमधील हॉटेलमध्ये मतदारांना रोख रक्कम वाटल्याप्रकरणी पोलिसांनी मंगळवारी तावडे, भाजपाचे उमेदवार राजन नाईक आणि इतरांविरुद्ध दोन एफआयआर नोंदवले.

पत्रकार परिषद संबोधित करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली भाजपा आणि बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांवर स्वतंत्र एफआयआर दाखल करण्यात आला आहे. ◀*(वृत्तसंस्था)*

# आता लक्ष शनिवारच्या मतमोजणीकडे

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**



२८८ सदस्यांच्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे एका टप्प्यातील मतदान आटोपले. ८१ सदस्यीय झारखंड विधानसभेसाठी दुसऱ्या टप्प्यातील मतदानही संपले. या राज्यात पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबरला मतदान झाले होते. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष शनिवार २३ नोव्हेंबरला होणाऱ्या मतमोजणीकडे राहणार आहे.

**राज्यात कोणाची सत्ता येणार, कोण होणार मुख्यमंत्री?**

झारखंडपेक्षाही महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा राष्ट्रीय राजकारणावर दूरगामी परिणाम होणार आहे. या निकालामुळे राज्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यताही नाकारता येत नाही. महाराष्ट्रात भाजपाच्या नेतृत्वातील महायुती आणि काँग्रेसच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी अशी लढत झाली. मनसे आणि अन्य काही छोटे पक्ष रिंगणात होते, पण खरी लढत या दोन आघाड्यांतच झाली.




महायुतीत भाजपासोबत शिवसेना एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार तर महाविकास आघाडीत काँग्रेससोबत शिवसेना उबाठा तसे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार असे दोन पक्ष होते. महायुतीत भाजपा सर्वाधिक म्हणजे १४९ जागा लढवत आहे, शिवसेना शिंदे गट ८१ जागा, तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट ५९ जागा लढवत आहे. महाविकास आघाडीत काँग्रेसने सर्वाधिक म्हणजे १०१ जागांवर उमेदवार उतरवले आहे. शिवसेना उबाठा ९५ जागा, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वाट्याला ८६ जागा आल्या आहेत.

महाराष्ट्रात अपेक्षेपेक्षा मतदान थोडे कमी झाले. मतदान कमी झाल्याचा फटका कोणाला बसतो, यावरही आता चर्चा होईल. गेल्या १५ दिवसांपासून राज्यात प्रचाराची रणधुमाळी सुरू होती. उमेदवारांना एक मिनिटाचीही फुरसत मिळत नव्हती. आता दोन दिवस सर्व उमेदवार आराम करू शकतात. मात्र, दोन्ही आघाड्यांतील ज्येष्ठ नेत्यांच्या नशिबी हे सुख नाही. या नेत्यांना राज्यभरात झालेल्या मतदानाचा आढावा घ्यावा लागेल. निकालानंतरच्या संभाव्य परिस्थितीचे मंथन करीत पुढील भूमिका ठरवावी लागणार आहे.

महायुतीची विजयाची टक्केवारी किमान ५० टक्के राहिली तरी, ती स्पष्ट बहुमत मिळवू शकते. महायुतीच्या बहुमतासाठी शिवसेना शिंदे गटाने ४०, तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने किमान २५ जागा जिंकणे आवश्यक राहील.

महाविकास आघाडीत काँग्रेस जरी सर्वाधिक म्हणजे १०१ जागा लढत असला, तरी तो आघाडीतील सर्वांत मोठा पक्ष राहील, याची खात्री नाही. आघाडीत तीनही पक्षांच्या जागा लढण्यातील अंतर खूप कमी आहे. त्यामुळे कोणताही पक्ष पुढे जाऊ शकतो. ■



राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन्



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे




उपमुख्यमंत्री अजित पवार



केंद्रीय मंत्री पीयूष गोयल कुटुंबासह



उद्धव ठाकरे, पत्नी शर्मिला व मुलगा आदित्य ठाकरेंसह

# मतोत्सवाचा उत्साह







| रिलायन्स समूहाचे प्रमुख मुकेश व अनंत अंबानी | टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन् | मुकुंद लि.चे अध्यक्ष नीरज बजाज



क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर पत्नी अंजली आणि मुलगी सारासह



क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे पत्नीसह

# सोलापूरच्या राजकारणात भूकंप!

### प्रणिती शिंदेंचा अपक्ष उमेदवाराला पाठिंबा


◆ **सोलापूर, २१ नोव्हेंबर**

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना काँग्रेसचे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यामुळे मतदारसंघात महाविकास आघाडीत बिघाडी झाली असून, उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार अमर पाटील यांची कोंडी झाली आहे.

सुशीलकुमार शिंदे, खा. प्रणिती शिंदे यांनी मतदान केल्यानंतर अपक्ष उमेदवार धर्मराज

काडादी यांना काँग्रेसचा पाठिंबा असल्याची माहिती बुधवारी माध्यमांना दिली. यावेळी सुशीलकुमार शिंदे म्हणाले, दक्षिण विधानसभा मतदारसंघ हा गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेसचा आहे. येथून मी दोनवेळा निवडणूक लढविली आहे. जागा वाटपात हा मतदारसंघ ठाकरे गटाकडे गेला. मात्र, येथे काँग्रेसची मोठी ताकद आहे. धर्मराज काडादी हे शांत, संयमी उमेदवार असल्याने ते सर्वांचे ऐकून घेतात. त्यांना पुढे मोठे भविष्य असल्याने काँग्रेसने त्यांना पाठिंबा दिला आहे.

दरम्यान, महाविकास आघाडीच्या जागा वाटपात दक्षिण सोलापूर हा मतदारसंघ ठाकरे शिवसेना गटाला सुटला आहे. येथून ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख अमर पाटील हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. मात्र, मतदानाच्या दिवशी सुशीलकुमार शिंदे यांनी अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा दिल्याने शिवसेना उमेदवाराची कोंडी झाली आहे. ◀*(वृत्तसंस्था)*





| आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास पत्नीसह | मुख्य सचिव सुजाता सौनिक

# भोसरीत ७,५०० मतदारांची नावे गायब

◆ **पुणे, २१ नोव्हेंबर**

लोकसभा निवडणुकीच्या वेळी अनेक मतदारांची नावे गायब होण्याचा प्रकार घडला होता. यावेळी पुण्यातील भोसरी येथे ७,५०० मतदारांची नावे गायब झाल्याचा प्रकार समोर आला आहे.

राज्यात २८८ विधानसभेच्या जागांसाठी मतदान पार पडले. मतदारांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. सर्व नेते, कलाकार नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करत होते. अशातच पुणे जिल्ह्यातील भोसरी मतदारसंघामध्ये अनेक मतदारांची नावे मतदार यादीतून गायब झाल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यानंतर मतदारांनी संताप व्यक्त केला आहे. आठवडाभरापूर्वी मतदार यादीत असणारी नावे डिलीट झाल्याचा आणि हडपसर, बारामती अशा विविध विधानसभेत ती टाकल्याचा दावा मतदारांनी केला. शिवाय ही नावे गायब कशी झाली, अशीही चर्चा सुरू आहे. यामागे सत्ताधारी आणि निवडणूक आयोगाची मिलिभगत असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला. ◀*(वृत्तसंस्था)*

# वृद्धांमध्ये मतदानाचा जास्त उत्साह

### व्हीलचेअरवरून, वॉकर घेऊन बजावले कर्तव्य

◆ **मुंबई, २१ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यात मतदान पार पडले असून, विविध मतदान केंद्रांवर तरुणाईसह ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती लक्ष वेधून घेणारी ठरली आहे.

ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती ही तरुणाईला प्रेरित करणारी ठरत आहे. बहुसंख्य वृद्ध मतदार मतदान केंद्रांवर हजेरी लावत आहेत. महापालिकेने रॅम्पची सुविधा उपलब्ध केल्यामुळे दिव्यांग मतदारांची मतदान केंद्रातील उपस्थिती लक्ष वेधून घेत आहेत.

मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती कौतुकास्पद ठरत आहे. अनेक वृद्ध मंडळी अतिशय उत्साहाने कोणी व्हिलचेअरवरून, कुणी वॉकर घेऊन, तर कोणी काठीचा आधार घेऊन मतदान केंद्रांवर हजर होत आहेत.

कुटुंबीय, पोलिस तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या (एनएसएस) स्वयंसेवक विद्यार्थ्यांकडून ज्येष्ठ नागरिकांना व्यवस्थितपणे प्रवेशद्वारापासून मतदान खोलीपर्यंत नेले जात आहे. त्यांच्या शंकांचे निरसन केले जात आहे.

विविध मतदारसंघातील मतदान केंद्रांवर पुरुष व स्त्री आणि ज्येष्ठ नागरिक मतदारांसाठी वेगळी रांग आणि त्याठिकाणी पंखे, दिव्यांगांसाठी विशेष सुविधा, पिण्याचे पाणी व शौचालयाची व्यवस्था, प्रतीक्षा कक्ष आदी विविध सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. ◀*(वृत्तसंस्था)*



| हेमामालिनी आणि मुलगी ईशा देओल | अक्षय कुमार | सुभाष घई आणि पत्नी मुक्ता घई | उर्मिला मातोंडकर | सुनील शेट्टी | राहुल बोस | दीपिका चिखलिया | श्रद्धा कपूर | माधुरी दीक्षित

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड लोकसभा, विधानसभेत जनतेच्या हातात कमळ !

**सुरेश काशिदे**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**



अत्यंत अटीतटीच्या झालेल्या विधानसभा निवडणुकीत बुधवारी मतदान झाल्यानंतर विविध संस्थांनी कंपन्यांनी केलेल्या एक्झिट पोल मध्ये सत्तारूढ महायुती व महाविकास आघाडी यांच्यामध्ये काट्याची टक्कर असल्याचे दर्शविण्यात आले आहे. काँग्रेस दोन नंबरवर राहील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तर केवळ नांदेड जिल्ह्याची परिस्थिती पाहिली असता लोकसभा पोटनिवडणुक व विधानसभा मतदानात बहूतांश मतदारसंघात मतदारांनी 'हातात' 'कमळ' घेतले असल्याचे चित्र दिसून येत आहे.

मतदान प्रक्रिया पार पडल्यांनतर आता सर्वच पोलमध्ये भाजपाला सर्वाधिक जागा मिळतील आणि लोकसभेत मोठी बाजी मारणारा काँग्रेस दुसऱ्या स्थानावर राहील, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. दोघांना अनुक्रमे ७८ व ६२ ठिकाणी विजयी होईल असे अंदाज दाखवण्यात आले आहेत. काहींच्या सर्व्हेत महायुतीला काठावरचे बहुतमत मिळेल, असे दर्शविण्यात आले आहे. तर काहींनी महाविकास आघाडी अवघ्या काही जागांनी सत्तेवर येईल, असे दाखविले आहे. दोन्ही प्रमुख आघाड्यांमध्ये सरासरी १५ ते २० जागांचा फरक असणार असल्याचे त्यात म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील दोन प्रमुख पक्षात फूट पडली. शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये पडलेल्या फुटीनंतर ही पहिलीच विधानसभेची निवडणूक असल्यामुळे या निवडणुकीकडे राज्याचेच नाही तर संपर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

नांदेड लोकसभा पोटानिवडणुक व विधानसभेसाठी बुधवारी मतदान झाले. नांदेड जिल्ह्यात लोकसभेसाठी ६५ तर विधानसभेसाठी ६९ टक्के मतदान झाले. मतदानानंतर आता केवळ पक्ष उमेदवारच नव्हे तर जनता देखील आकडेमोड करण्यात व्यस्त झाली आहे. राजकीय विश्लेषक तसेच विविध कंपनीच्या सर्वे नुसार पुन्हा महायुतीला जास्त जागा मिळणार असल्याच अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. परंतू नांदेडात मात्र संमिश्र अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मतदारांमधील चर्चा आणि मतदानाची टक्केवारी त्यातच उमेदवारांची वाढलेली संख्या त्यामुळे विजयी उमेदवार मोजक्याच मताने विजयी होणार असल्याचे बोलले जात आहे. महायूती आणि काँग्रेसची काट्याची टक्कर असली तरी नांदेड लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघात मात्र जनतेने महायूती आणि कॉंग्रेसला बरोबरीने साथ दिली असल्याची परिस्थिती आहे.



नांदेड दक्षिण आणि उत्तर मतदारसंघात काँग्रेस आणि महायूती तर दक्षिण मतदारसंघात वंचीत बहूजन आघाडीच्या उमेदवारांना चांगली लढत दिली. भोकर मतदारसंघात सुरुवातीला महायूती विरोधात वातावरण होते परंतू मतदान प्रक्रीया जवळ येताच हे वातावरण अचानकपणे बदलून विधानसभा महायूती तर लोकसभा काँग्रेस अशीच काहीशी परिस्थिती निर्माण झाली आहे. किनवट मतदारसंघात विधानसभा महायुती तर लोकसभेत देखील महायूती अशी परिस्थिती आहे. तर दुसरीकडे देगलूर आणि लोहा मतदारसंघात घड्याळाच्या साथीने कमळाला साथ मिळणार असल्याची शक्यता आहे. अशीच काहीशी परिस्थिती देगलूर मतदारसंघात देखील निर्माण झाली आहे. नायगाव विधासभा मतदारसंघात महायूतीच्या अमेदवाराला मोठ्या प्रमाणात विरोध झाला असला तरी शेवटी त्या विरोधाचा फायदा देखील महायूतीच्या उमेदवारालाच होण्याची शक्यता आहे. तर लोकसभेच्या बाबतीत या ठिकाणी काँग्रेसला साथ मिळणार हे देखील तेवढेच खरे आहे. अशीच काहीशी परिस्थिती मुखेड विधानसभेतही असून या ठिकाणी ही विद्यमान आमदारांनाच पून्हा संधी मिळण्याची चाहूल असून लोकसभा बाबतीत जनतेने हाताला साथ दिली असल्याचे दिसून आले. तर हदगाव मतदारसंघात लोकसभेसाठी मतदारांनी महायूतीला जवळ केले असले तरी विधानसभेत देखील महाविकास आघाडीला दुर केले नाही. त्यामुळे या विधानसभा मतदारसंघात लोकसभेची पूनरावृत्ती होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. एकुणच मतदानानंतरची चर्चा पाहता नांदेड लोकसभेत डॉ. संतुक हंबर्डे, भोकर विधानसभेत महायुतच्या श्रीजया चव्हाण, किनवट भिमराव केराम, देगलूर जितेश अंतापुरकर, लोहा माजी खा. प्रताप पा. चिखलीकर, नांदेड दक्षिण मोहन हंबर्डे, नांदेड उत्तर बालाजी कल्याणकर, नायगाव राजेश पवार, मुखेड डॉ. तुषार राठोड तर हदगाव विधानसभचे माधव जवळगावकर हेच विजयाचे दावेदार असल्याची चर्चा आहे.

# लोकसभा पोटनिवडणुकीसाठी ६७.८१तर विधानसभेसाठी ६९.४५ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व ९ विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ३ हजार ८८ मतदान केंद्रावर शांततेत मतदान पार पडले. मतदारांनी मतदान केंद्रावर सकाळी ७ वाजेपासून लांबच लांब रांगा लावल्या होत्या. दिव्यांग, जेष्ठ मतदारासोबत नवमतदार आणि तृतीयपंथीयांनी मतदानासाठी उपस्थिती लावली. यावर्षी २५ वर्षानंतर एकाच वेळी लोकसभा व विधानसभेसाठी एकाच शाईत दोन मतदान करण्याचा अनुभव मतदाराना मिळाला.

या निवडणुकीत लोकसभेसाठी १९ तर विधानसभेसाठी १६५ उमेदवारांचे भविष्य आज मतदान यंत्रात बंद झाले आहे. या लोकसभेसाठी १९ लाखांच्यावर व विधानसभेसाठी २७ लाखांच्यावर मतदारांचा समावेश आहे. बुधवारी सकाळी नांदेड जिल्ह्यामध्ये सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली. काही ठिकाणी सकाळपासूनच मतदानासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. नांदेड लोकसभेसाठी आज सकाळी ९ वाजता ६.०३ तर विधानसभेसाठी ५.४२ टक्के मतदान झाले. सकाळी नांदेड मतदार संघातील लोकप्रतिनिधीनीसह अनेक मान्यवरांनी मतदानाचा हक्क बजावला. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सहकुटूंब व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनीही आयटीआय परिसरातील कामगार कल्याण केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. नवमतदार, जेष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिक, तृतीयपंथीय यांनी उत्स्फूत प्रतिसाद दिला असून त्यांनी मोठया प्रमाणात मतदानाचा हक्क बजावला.

सकाळी ११ वाजेपर्यत लोकसभेसाठी १२.५९ तर विधानसभेसाठी १३.६७ टक्के मतदान झाले. आज दुपारी १ वाजता २७.२५ तर विधानसभेसाठी २८.१५ टक्के मतदान झाले. दुपारी ३ वाजेपर्यत लोकसभेसाठी ४१.५८ तर विधानसभा क्षेत्रात ४२.८७ टक्के मतदान झाले होते. रात्री उशिरा अधिकृत अंतिम आकडेवारी जाहीर करण्यात आली. त्यात लोकसभेसाठी ६७.८१ तर विधानसभेसाठी ६९.४५ एवढी होती. या निवडणुकीसाठी गेल्या ४० दिवसापासून जिल्हा प्रशासन कार्यरत आहे. १५ हजार कर्मचारी तसेच पोलीस व राखीव दलाच्या तुकडया गेल्या काही दिवसांपासून कार्यरत होत्या. आज दिवसभर वॉररुम व वेबकास्टिंग कक्षाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी अभिजीत राऊत निवडणूक आयोग व सामान्य मतदार यांच्या संपर्कात होते. वेब कास्टिंग विभागात वरिष्ठ अधिकारी निगराणी ठेवून होते. रात्री उशिरापर्यत या यंत्रणेमार्फत अनेक ठिकाणच्या मतदान केंद्रावर ते लक्ष ठेवून होते.

बुधवारी दिवसभर इव्हिएम व अन्य कोणतीही अडचण आल्यास तातडीने विशिष्ट वेळात समस्या सोडवली जात होती. विधानसभा निहाय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या संपर्कात ते होते. मतदान यंत्राच्या बदलाच्या एक दोन घटना वगळता जिल्ह्यामध्ये कुठेही मतदान थांबले नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी यासोबत अनेक केंद्राना अनेक ठिकाणी आकस्मिक भेटी दिल्या.तसेच याकाळात निवडणूक निरीक्षकांनी देखील भेटी दिल्या व परिस्थितीवर लक्ष दिले.

सन २०१९ च्या विधानसभा मतदारसंघात किनवट ७०.९०, हदगाव ७०.२०, लोहा ६९.७३ भोकर-७३.९९, नांदेड उत्तर ६१.२०, नांदेड दक्षिण-६३.६६, नायगाव ७३.८०, देगलूर ६०.८०, मुखेड ६६.२० असे एकूण ६७.८३ टक्के मतदान झाले होते.

यावर्षी निवडणूक विभागाने प्रत्येक विधानसभा मतदारसंघामध्ये महिला, दिव्यांग व तरुण अधिकाऱ्यांचे मतदान केंद्र उभारले होते. याशिवाय ५३९ पर्दानसिन केंद्र कार्यरत करण्यात आले होते. यासोबतच विष्णुपूरी जि.प. शाळेत पर्यावरण पूरक केंद्र उभारले होते. मात्र सोबतच प्रशासनाने यावेळी प्रत्येक केंद्रामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या होत्या. यामध्ये पिण्याचे पाणी, दिव्यांगासाठी रॅम, दिवाबत्ती, बसण्याची व्यवस्था, काही केंद्रावर सेल्फी पॉईट व अन्य सजावट करण्यात आली होती. मतदारांनी एकाच वेळी दोन ठिकाणी गतीने मतदान झाल्याबद्दल लोकसभा मतदार संघात समाधान व्यक्त केले. मोठया संख्येन जनतेने मतदानाला प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा प्रशासनाने मतदाराचे आभार व्यक्त केले आहे. जिल्ह्यामध्ये याकाळात कोणत्याही अप्रिय घटनेची नोंद नाही.

**२३ नोव्हेंबरला मतमोजणी**

बुधवारी मतदान पार पडल्यानंतर दोन दिवसांनी २३ नोव्हेंबरला शनिवारी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात होणार असून किनवटला आयटीआय कॉलेजमध्ये, हदगावला समाज कल्याण भवन येथील अनुसूचित जातीचे मुलींचे शासकीय वसतीगृह तर लोहा येथे महसूल हॉल, तहसिल कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

# मतदान यंत्रावरील नाव व निशाणी स्पष्ट दिसत नसल्यामुळे लोकसभा पोट निवडणूक रद्द करा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**

नांदेड १६-लोकसभा निवडणुकीतील इव्हीएम मशीनवरील काही उमेदवारांचे नाव व निशाणी अस्पष्ट दिसत असल्यामुळे मतदारांना मतदान करताना अनेक अडचणी येत होत्या, त्यामुळे नांदेड लोकसभा पोट निवडणूक रद्द करावी, अशी मागणी जनहित लोकशाही पार्टीचे उमेदवार नागोराव वाघमारे यांनी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

**जनहित लोकशाही पार्टीचे अधिकृत उमेदवार नागोराव वाघमारे यांची मागणी**

नांदेड १६-लोकसभेचा जनहित लोकशाही पार्टीचे उमेदवार नागोराव दिगंबर वाघमारे यांची निशाणी ऑटोरिक्षा असून इव्हीएम मशीन यंत्रावरील त्यांचे नाव व निशाणी स्पष्ट दिसत नसून ती अत्यंत फिकट (अस्पष्ट) दिसत होती. त्यामुळे अनेक मतदारांचे त्यांना फोन आले की, आपली निशाणी व नाव ओळखू येत नाही. त्यामुळे मतदारांना मतदान करण्यासाठी अडचण आली असून त्यामुळे ही निवडणूक रद्द करून पुन्हा नाव व निशाणी स्पष्ट दिसेल असे इव्हीएम मशीनवर लावून नांदेड लोकसभा पोट निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी नागोराव वाघमारे यांनी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



**नांदेड-बुधवारी मतदान पार पडल्यानंतर दोन दिवसांनी २३ नोव्हेंबरला शनिवारी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाच्या ज्ञान स्त्रोत संकुलात होणार असून मतमोजनीची तयारी सुरु आहे नांदेड लोकसभा मतदार संघातील मतपेट्या विद्यापिटात दाखल झाल्या आहेत. मतमोजणी ठिकाणी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीची मतमोजणी विद्यापिठात तसेच किनवटला आयटीआय कॉलेजमध्ये, हदगावला समाज कल्याण भवन येथील अनुसूचित जातीचे मुलींचे शासकीय वसतीगृह तर लोहा येथे महसूल हॉल, तहसिल कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.**

## संक्षिप्त वृत्त


### इंदिरा गांधी ह्या भारत देशाच्या सामाजिक व राजकीय महान राष्ट्रीय नेत्या : मिसलवाड



**नांदेड**-वयाच्या आकराव्या वर्षापासूनच भारत देशसेवेचे ध्येयवेड्या असलेल्या व विविध मंत्रीपदावर राहुन भारत देश समृद्धीसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक व राजकीय राष्ट्रीय महान नेत्या म्हणजेच माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा प्रियदर्शनी गांधी ह्या होत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. १९ नोव्हेंबर २०२४ मंगळवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता आयर्न लेडी, भारतरत्न, तिसऱ्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा प्रियदर्शनी गांधी यांची १०७ वी जयंती राष्ट्रीय एकात्मता दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या अभिवादन कार्यक्रम सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. सर्वप्रथम आगाराचे सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक मा.श्री. विष्णूकांत हारकळ व श्रीनिवास रेणके यांच्या हस्ते श्रीमती इंदिरा प्रियदर्शनी गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, इंदिरा गांधी यांनी आपल्या १५ वर्षे पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात ४१ आंतरराष्ट्रीय देशांचा सामाजिक अभ्यास दौरा करुन भारत देश विकसीत करण्यासाठी फॅक्ट्री कामगार बजेट, हरित क्रांती, शेतकऱ्यांसाठी बजेट, बँकांतील पैशांचे राष्ट्रीयीकरण करुन विनियोग, गरीबी हटाव चा नारा असे एक ना अनेक विधायक मोठे कार्य त्यांनी केले. अशा या थोर व्यक्तीमत्त्व नेत्यांचा आदर्श घेऊन आपण सर्वांनीच देशाप्रती, समाजाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज आहे, असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी गुणवंत एच. मिसलवाड यांनी राष्ट्रीय एकात्मतेची प्रतिज्ञा (शपथ) चे वाचन करुन सामूहिकरित्या कामगार- कर्मचाऱ्यांना शपथ दिली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक विष्णूकांत हारकळ, श्रीनिवास रेणके, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वाहतुक नियंत्रक सुनील मोरे, आनंदा कंधारे, राजेश कांबळे, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, नितीन मांजरमकर, सुनीता हुंबे, श्वेता तेलेवार, संगीता वाघमारे, मनिषा कदम, वैष्णवी गंदेवार, प्रियंका खरात, संजय मंगनाळे, शिवचरण मळगे, श्रीकांत अंकुशे, चालक राहुल लांडगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रा.प.म. आगारातील कामगार- कर्मचारी, बंधु- भगिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नांदेडचे सुप्रसिद्ध गायक कलावंत पं. संजय जोशी सह्याद्री दूरदर्शनवर

**नांदेड**-गीत रामायण आणि सुगम संगीताच्या कार्यक्रमातून अवघ्या महाराष्ट्राला आपल्या सुमधुर व भावपूर्ण गायनाने सुपरिचित असणारे नांदेडचे सुप्रसिद्ध गायक पं. संजय जोशी यांचा संगीत प्रवास सह्याद्री



दूरदर्शनच्या मैत्र हे शब्द सुरांचे या कार्यक्रमात उलगडणार आहे. संजय जोशी यांनी आतापर्यंत एक हजारच्या वर गीत रामायणाचे आणि तीन हजार चे वर सुगम व नाट्य संगीताचे कार्यक्रम देश विदेशात केले आहेत. आणि ते पुरस्कार प्राप्त रंगभूमीवरील गायक नट म्हणूनही परिचित आहेत. अनेक संगीत नाटकातून त्यांनी भूमिका गाजवल्या आहेत. जोशी हे आकाशवाणीचे बी हाय दर्जाचे कलावंत असून त्यांनी कबीर व कविवर्य ग्रेस यांच्या रचनांना संगीत दिलेले कार्यक्रम रसिकांच्या पसंतीस उतरले आहेत. पं. संजय जोशी यांची मुलाखत घेणार आहेत दूरदर्शन वरील सुप्रसिद्ध निवेदक तथा गायक कलावंत विघ्नेश जोशी. आणि साथसंगत करणार आहेत डॉ. जगदीश देशमुख (तबला), पं. पंकज शिरभाते (व्हायोलिन), स्वरूप देशपांडे आणि विविध ताल वाद्यांवर साथ करणार आहेत प्रसाद जोशी. हा कार्यक्रम दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर २४ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री ८.३० वाजता प्रसारित होणार आहे. याचेच पुनर्प्रसारण रविवार दिनांक १ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी दहा वाजता आणि सायंकाळी पाच वाजता दाखवण्यात येणार आहे. सर्व संगीत रसिकांनी अवश्य कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

### राज्य उत्पादन शुल्कच्या कारवाईत ८ लाखाचा मुद्देमाल जप्त

**नांदेड**-राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयात नव्यानेच रुज झालेल्या प्रशिक्षीत पोलिस उप. अधीक्षक रत्नमाला गायकवाड यांनी आचारसंहिता काळात ५४ ठिकाणी धाड टाकून ५४ आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून ८ लाख ८ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. किनवट येथे नव्यानेच रुजू झालेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पोलिस उप.अधीक्षक रत्नमाला गायकवाड यांनी १५ ऑक्टोवर ते आजपर्यंत तव्वल ५४ ठिकाणी धाडी टाकत ५४ आरोपींना अटक केली आहे. तसेच या कारवाईत एकूण ८ लाख ८ हजार ३६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे दोन्ही तालुक्यात हातभट्टीवर चालवणारे व दारूची अवैध विक्री करणाऱ्यांचे धावे दणाणले आहे.

# वंचितचा प्रचार भोवला, ब्राम्हणवाडेकर यांच्या साहित्याची नासधूस

**विमानतळ पोलीस ठाण्यात अज्ञातांविरूद्ध गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**

मागील तीन महिन्यांपासून ब्राह्मणवाडा गावात जलजीवन मशीनचे काम चालू आहे, परंतु तीन महिन्यात एकाही रुपयाचे नुकसान कोणत्याही गावकऱ्यांकडून झालेले नाही. मतदानाच्या दिवसभर वंचित बहुजन आघाडीचे लोकसभेचे उमेदवार अविनाश भोसीकर आणि नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील उमेदवार फारुख अहमद यांच्या प्रचारार्थ एकनाथ बत्तलवाड ब्राह्मणवाडेकर हे बुथवर थांबले होते. त्यांच्यावर बुधवारी प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मतदान केंद्रप्रमुख व पोलिसांनी प्रसंगाचे गांभीर्य पाहून त्यांच्या अंगावर आलेल्या भाजपच्या लोकांचा हल्ला पाहून बुथमध्ये अर्धा तास बंद करून ब्राह्मणवाडेकर यांना संरक्षण देण्यात आले. त्यामुळे त्यांचे प्राण वाचले.

ही घटना श्रद्धेय ॲड. बाळासाहेब आंबेडकरांशी रात्री दहा वाजता ब्राह्मणवाडेकर यांनी सांगितली. ते म्हणाले काळजी करू नकोस, मी आहे. त्यावर ब्राह्मणवाडेकर शांत बसले, परंतु त्यावर विरोधक गप्प बसले नाहीत. त्यांनी गुरूवारी सकाळी ब्राह्मणवाडा गावातील साईटवर पीव्हीसी पाईप व जेसीबी मशीनचे नुकसान केले. म्हणून त्यांनी अज्ञात व्यक्तींविरोधात विमानतळ पोलीस स्टेशन येथे तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

वंचित बहुजन आघाडीचे मतदान पाहून विरोधकांच्या डोळ्यात खुपू लागले. भाजपचे कार्यकर्ते वयोवृद्ध माणसं नसतानाही बुथमध्ये नेऊन ते मतदान करत होते, त्यांना ब्राह्मणवाडेकर यांनी विरोध केला असता बीजेपीच्या २५ ते ३० लोकांनी त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. याचा व्हीडीओ सोशल मीडियावर आहे. पोलीस निरीक्षक चव्हाण हे येईपर्यंत ब्राह्मणवाडेकर यांचा जीव वाचवण्यासाठी येथील अधिकाऱ्यांनी बुथमध्ये अर्धा तास बंद ठेवून त्यांना संरक्षण दिले, म्हणून त्यांचा जीव वाचला.

परंतु रात्री दहा ते आज सकाळी पाचच्या दरम्यान गावातील गावगुंडांनी उपसरपंच प्रतिनिधी या नात्याने ब्राह्मणवाडेकर हे जलजीवन मिशनचे काम पाहत असलेले बुद्ध विहारासमोर नळ कनेक्शनचे तीन पीव्हीसी पाईप फोडून टाकून नुकसान केले व पाईप घेऊन गेले तसेच जेसीबी मशीनचे नुकसान केले. त्यामुळे अज्ञात इसमांविरोधात आज पहाटे सकाळी विमानतळ पोलीस स्टेशन गाठून ब्राह्मणवाडेकर यांनी तक्रार दिलेली आहे व आरोपींवर कठोर कारवाई करावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

# शालेय राज्यस्तरीय थांग-ता मार्शल आर्ट स्पर्धेसाठी वर्धा येथे संघ रवाना



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**

पुणे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने येथे दिनांक २४ ते २६ नोव्हेंबर रोजी क्रीडा संकुल वर्धा येथे राज्यस्तरीय शालेय थांग-ता मार्शल आर्ट स्पर्धा होणार आहेत त्यासाठी लातूर विभागातून समीर पिन्यप्रतिवार, सोहम पल्लेवाड, कृष्णा तायडे, ज्ञानेश्वरी नाकाडे ,स्नेहा पप्पुलवाड, तन्वी पवितवार, राजवीरसिंह चौहाण, ओम गुट्टे, स्वयंम गिरी, मानिनी क्षीरसागर, मयुरी गजभारे, सृष्टी मोतेवार, वैष्णवी पांचाळ, प्रणिता वारकड, आदित्य कोटगिरे, प्रणव वारकड, सुयशा क्षीरसागर, वरील सर्व खेळाडूंची निवड वेगवेगळ्या वजन व वयोगटात मध्ये झालेली आहे खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक एकनाथ पाटील महिला प्रशिक्षकअनुराधा पाटील सह प्रशिक्षक विशाल कंदुलवार यांनी केले जिल्हा नांदेड जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेभरे क्रीडाधिकारी विपुल सर मल्लखांब संघटनेचे सचिव कुलदीप सिंग जट सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत हंबर्डे संजय वाघमारे मनपा सिडको विष्णू जोशी संकेत पाटील दिलीप कदम यांनी खेळाडूंच्या अभिनंदन केव्हा पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# बौद्ध महिलांनी खा.डॉ.अजित गोपछडे यांना वाढदिवसानिमित्त दिले आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**

भाजपाचे नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय राज्यसभा खा.डॉ. अजित गोपछडे यांचा वाढदिवस दलित वस्तीतील महिलांनी औक्षण करून त्यांना शुभाशीर्वाद दिले. वास्तव तर हे आहे की,आजच्या काळात साधीसुधी माणसे देखील बडेजावचा आव आणत हारतुरे आणि बँनरबाजी करत फार मोठ्या प्रकारे वाढदिवस साजरा करत असतात. परंतु यास अपवाद ठरवत खा.डॉ.अजित गोपछडे यांची त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांची नाळ जन्मभूमी कोल्हे बोरगाव गावातील गोरगरीब लोकांप्रती असलेली जाण व तळमळ आदींशी घट्ट आहे हे प्रकर्षाने जाणवते. साधी राहणी व उच्च विचार या उक्तीप्रमाणे डॉ. गोपछडे हे वैद्यकीय क्षेत्रातील एक निष्णात डॉक्टर असून देखील त्यांनी त्यांचा वाढदिवस बँनरबाजी न करता, हारेतुरे न स्विकारता जन्मभूमी असलेल्या कोल्हेबोरगाव येथे दलितवस्तीने आयोजित कार्यक्रमात अत्यंत साध्या पद्धतीने आणि प्रचंड उत्साहाने वाढदिवस साजरा केला. वाढदिवस कसा



साजरा करावयाचा असतो याचा एक आदर्श पाठच डॉ.गोपछडे यांनी यानिमित्ताने उपस्थितांना घालून दिला. खरोखरच त्यांना लहानपणापासून गोरगरीब, दीनदुबळे यांच्याप्रती फार कनवळा असल्याने आणि आईवडीलांच्या संस्कारात वाढल्याने त्यांना सामाजिक जाण कमालीची आहे, हे यानिमित्ताने उपस्थितीतांना समजली. त्यांनी दलितवस्तीमध्ये गोरगरीब माता भगिनीं आणि लहान मुलींच्या समवेत वाढदिवसाच्या निमित्ताने औक्षण स्विकारुन आशीर्वाद घेतले. यानिमित्ताने गावातील महिला सुशिक्षित व्हावे या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांनी पुढाकार घ्यावा,महिला आणि उद्योग धंद्यात पुढे यावे मुलींच्या शिक्षणासाठी वेळ दिला पाहिजे, महिला सुशिक्षित झाली तर समाज सुशिक्षित होतो त्यामुळे महिलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.तसेच तरुणांनी व्यसनमुक्त व्हावेत आणि सर्व जनतेनी हागणदारीमुक्त गाव करावा हीच भेट वाढदिवसानिमित्त मला पुढच्या वर्षी पर्यंत द्यावी असे भावनिक आवाहन यानिमित्ताने डॉ.गोपछडे यांनी उपस्थित नागरिकांसमोर व्यक्त केले. अत्यंत साधेपणाने आणि उत्साहाने साजरा करण्यात आलेल्या वाढदिवस प्रसंगी उमाकांत गोपछडे, हावगीराव गोपछडे, कुंचनवार, रुपेश पाटील भोकसखेडकर, रेड्डी सर, शिवाजी शिंदे, आदित्य चोंडीकर, दत्ता दीवडे, रमेश गाडेकर, बाबू गादेवार, बनसोडे सर, भाऊसाहेब गाडेकर, मारोती गाडेकर, पंचक्रोशीतील अनेक मान्यवर,अनेक जेष्ठ नागरिक, माताभगिनी,तरुण वर्ग आणि लहानथोर देखील फार मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## बाल संस्कार वर्गाला मुलांचा प्रतिसाद

### दर रविवारी आयोजन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : जय जय रघुवीर समर्थ सेवाभावी संस्थेच्या वतीने समर्थ नगरमधील श्रीराम मंदिरात बाल संस्कार वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यात बालकांमध्ये संस्कार, आहार-विहार, व्यायाम, योगासह श्रीसमर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक तसेच श्रीसमर्थ रामदास स्वामींनी रचलेले श्रीमारुती स्तोत्र, त्रिकाल संध्या याचबरोबर श्रीज्ञानेश्वर माऊलीचे पसायदान उपस्थित मुलांच्या मुखातून वदवून घेण्यात आले.

यानिमित्त चिन्मय संस्थानचे श्रीअपनेशानंद स्वामी व श्री समर्थ रामदास स्वामी अभ्यासक सुषमाताई धांडे यांनी उपस्थित मुलांना व पालकांना श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या कार्याबद्दल मार्गदर्शन केले. मुलांनी दैनंदिन जीवनामध्ये कशाप्रकारे वर्तन असावे याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर चिन्मय संस्थांचे श्रीआत्मसानंद स्वामी यांच्या हस्ते श्रीरामाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष सुहास ठोसर यांनी प्रास्ताविक केले. यामध्ये त्यांनी संस्थे अंतर्गत चालू असलेल्या वेगवेगळ्या अभियानाबद्दल माहिती दिली. संस्थेचा मुख्य उद्देश श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या कार्यांचा प्रचार व प्रसार करणे हा आहे, असे यावेळी त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सचिव लक्ष्मीकांत राजुरकर यांनी, तर आभार प्रदर्शन सहसचिव प्रकाश सनान्से यांनी केले. दरम्यान, चिन्मय संस्थेचे श्रीआत्मेशानंद स्वामी यांचा सत्कार संस्थेचे संपर्कप्रमुख नरेश देवळे व संस्थेचे पदाधिकारी गजानन देशमुख व सुधीर पोतदार यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन केले. उपस्थित मुलांना संस्थेतर्फे खाऊ वाटप करण्यात आला. प्रत्येक मुलाला श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांचे पुस्तके देण्यात आली. यावेळी मुलांसह त्यांचे पालक उपस्थित होते उपस्थित होते. संस्थेअंतर्गत हा बाल संस्कार वर्ग यानंतर प्रत्येक रविवारी ८.३० ते ९.३० यावेळेत समर्थनगरमधील श्रीराम मंदिरात घेतला जाईल. जास्तीत जास्त मुलांनी सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष सुहास ठोसर यांनी सर्वांना केले.

## पोलिस कर्मचाऱ्याने घेतला गळफास

छत्रपती संभाजीनगर : दहशतवाद विरोधी पथकात कार्यरत पोलिस कर्मचाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. हसूल परिसरातील घृष्णेश्वर कॉलनीत १८ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली. कैलास पांडुरंग मळेकर (वय ४१) असे आत्महत्या केलेल्या पोलिसाचे नाव आहे. त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही. या प्रकरणी हसूल ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मळेकर हे २००४ मध्ये शहर पोलिस दलात भरती झाले होते. मागील ६ वर्षांपासून ते एटीएसमध्ये कार्यरत होते. एटीएस अधीक्षकांच्या कार्यालयात ते काम करायचे. मळेकर यांनी रविवारी रात्री १२ वाजेपर्यंत कुटुंबीयांसोबत गप्पा मारल्या. बराच वेळ ते मोबाईलवर वेळ घालवत बसले होते. रात्रीच्या सुमारास घरातील सदस्य झोपण्यासाठी गेल्यानंतर तेही त्यांच्या खोलीत झोपण्यासाठी गेले. पहाटे तीन वाजेच्या सुमारास त्यांची मुलगी अभ्यासासाठी उठली असता तिची वडिलांच्या खोलीत नजर गेली. तेव्हा ते गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. तिने आरडाओरडा केल्यानंतर घरातील नातेवाईक जागे झाले. अनिल ताठे आणि दिलीप चंदनसे यांनी तातडीने मळेकर यांना घाटीत दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. कैलास मळेकर यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे.

## हुडहुडी वाढली, जनजीवन गारठले

### पुढे थंडी आणखी वाढण्याचे संकेत

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

पावसाळी वातावरण निवळताच उत्तरेकडील थंड वारे महाराष्ट्राकडे येऊ लागल्यामुळे मंगळवार, १९ नोव्हेंबरपासून थंडी वाढली आहे. ग्रामीणभागासह शहरातही हुडहुडी वाढली असून जनजीवन गारठेन गेले आहे. यापुढे थंडी आणखी वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्याचा तापमानाचा पारा पुन्हा घसरला आहे. शहर आणि जिल्ह्यातही थंडी वाढू लागली असून, किमान तापमान ११ ते १४ अशांपर्यंत घसरले आहे. बुधवार, २१ नोव्हेंबरपासून तापमानात २ ते ४ अंशांची घट होणार असल्याने शहरासह संपूर्ण मराठवाड्यात गारठा वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

**पेटू लागल्या शेकोट्या**

**वाढत्या थंडीमुळे शहरासत ग्रामीण भागात ठिकठिकाणी शेकोट्या पेटू लागल्याा असून, नागरिकांनी स्वेटर, मफलर, कानटोप्या अशी उब देणारी कपडे बाहेर काढली आहेत. दिवाळीनंतर कडाक्याची थंडी सुरू होत असते, आता ती सुरु झाली असून, पुढील काही दिवसांत थंडी आणखी वाढणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.**

ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे म्हणाले, कोमोरिन भाग आणि परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती तयार झाली आहे. दक्षिण भारतात पाऊस सुरू असून, उत्तर भारतात आकाश निरभ्र होत थंडी वाढू लागली आहे. मराठवाड्यासह राज्यात अनेक ठिकाणी किमान तापमान १५ अंशांपेक्षा खाली आले आहे. उर्वरित राज्याच्या किमान तापमानातही घट होत आहे, असे डॉ. साबळे म्हणाले. यापुढे किमान तापमानात घट होण्याची शक्यता असून, गारठा वाढण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

वाढती थंडी गहू पेरणीसाठी उपयुक्त असून, तूर पिकासाठी देखील शेंगा भरण्यासाठी फायदेशीर असल्याचे राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाचे शास्त्रज्ञ डॉ. सूर्यकांत पवार यांनी सांगितले. सध्या रब्बी हंगाम सुरू असून, थंडीअभावी गव्हाची पेरणी खोळंबली आहे. काही ठिकाणी तुरीला शेंगा लगडल्या असून, दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे. मागील आठवड्यात ढगाळ वातावरण असल्याने तूर पिकावर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला होता. आता दिवसा कडक उन आणि रात्री-पहाटे हुडहुडी भरणारी थंडी सुरू झाल्यामुळे पिकांसाठी उपयुक्त असल्याचे डॉ. पवार म्हणाले.

सुरुवातीस थंडी सुरू झाली. मात्र, गेल्या आवठवड्यात थंडी गायब झाली होती. आता थंडी पुन्हा सुरू झाली असून, मंगळवारपासून हुडहुडी भरणारी थंडी सुरू झाली आहे.

## एमजीएममध्ये गुरू नानक जयंती उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न





छत्रपती संभाजीनगर, दि.२१ : महात्मा गांधी मिशन तर्फे एमजीएम विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारत येथे गुरू नानक जयंतीचे औचित्य साधून आज सकाळी ११ वाजता विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमात प्राध्यापक, विद्यार्थी आणि सर्व संबंधितांनी गुरु नानक देवजींच्या शिकवणीचे स्मरण केले. यावेळी, कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी, एमजीएम परिवारातील सर्व सदस्य, शीख बांधव व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सत् नाम सत् नाम सत् नाम जी वाहेगुरू वाहेगुरु वाहेगुरू जी, दमदम वाहेगुरु, कल तारण गुरुनानक आया नानक आया गुरू नायक आया, सत् नाम सत् नाम सत् नाम दा चकर फिराया, सत् गुरू नानक ज्ञान कर्म जान, धन गुरु नानक, हर दिन हर सिमरन, जो जो नामा हर गुण आदि भक्तीपर गीते आणि भजने गाण्यात आली.

यावेळी बोलताना म्हणाले वरियम सिंह तथा ज्ञानी जी म्हणाले , गुरु नानक देव जी यांचे जीवन आणि शिकवण आजही लाखो लोकांना प्रेरणा देते. त्यांनी शीख धर्माची स्थापना केली आणि समता, सेवा, सत्य आणि समर्पणाचा संदेश दिला. सर्वांसाठी प्रेम, भेदभाव न करता सेवा आणि ईश्वरावरील अपार भक्तीचा संदेश त्यांच्या शिकवणीत आहे.

आपण वापरत असलेल्या लेखणीत शाई नसेल तर त्या लेखणीचा काहीही उपयोग नाही त्याचप्रमाणे माणसामध्ये माणुसकी नसेल तर तो माणूस काहीही कामाचा नाही. चांगले विचार आणि चांगले गुण माणसामध्ये असतील तर त्या व्यक्तीला परमात्मा मिळेल अन्यथा नाही. सगळ्यांची निर्मिती ईश्वराने केली असेल तर आपण आपापल्यामध्ये भेदाभेद करणे चुकीचे असल्याचे वरियम सिंह यांनी यावेळी सांगितले.

वरियम सिंह पुढे बोलताना म्हणाले, विद्यार्थी प्रामानिकपणे अभ्यास करतात आणि शिक्षकांचे ऐकतात. विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षकांची भूमिकाही महत्त्वपूर्ण असून त्यांनी विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण दिले पाहिजे. परमात्माची सर्वजण वेगवेगळ्या प्रकारे आठवण करीत असतात. ईश्वर एक असून ईश्वरास कोणी वाहेगुरू,कोणी गॉड, कोणी अल्ला, कोणी राम अशा पद्धतीने संबोधित करीत असतात.

## अपक्ष उमेदवार प्राध्यापक सुरेश सोनवणे यांच्यावर खुलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१९ नोव्हेंबर : विधानसभा मतदारसंघ गंगापूर ,मतदान केंद्र क्रमांक ८७ सुलतानपूर ,तालुका खुलताबाद येथे अपक्ष उमेदवार श्री सुरेश साहेबराव सोनवणे यांनी सकाळी ८:४५ च्या सुमारास मतदान केंद्राच्या आत प्रवेश केला व बि.यू मांडणी पाहणी केली व ही मांडणी चुक आहे असे सांगितले .तसेच केंद्रात मोबाईल नेण्यास बंदी असतानाही मोबाईल सोबत नेऊन बि.यू व व्ही व्ही पॅट कक्ष व्हिडिओ रेकॉर्डिंग करून मतदान प्रक्रिया दहा मिनिट बंद पाडली तसेच सदर रेकॉर्डिंग चा व्हिडिओ व्हाट्सअप वर प्रसारित केला .

तसेच मतदान केंद्र क्रमांक ५१ कनकशिळ ,तालुका खुलताबाद येथे अपक्ष उमेदवार श्री सुरेश साहेबराव सोनवणे यांनी सकाळी ९:५६ च्या सुमारास मतदान केंद्राच्या आत मोबाईल नेण्यास बंदी असतानाही मोबाईल सोबत नेऊन पूर्ण मतदान केंद्राची व्हिडिओ शूटिंग केले.

सदरील दोन्ही घटनाकरिता अपक्ष उमेदवार श्री सुरेश साहेबराव सोनवणे यांच्यावर लोकप्रतिनिधी नियम १९५१ चे कलम १३०,१३२ व भारतीय न्याय सुरक्षा संहितेचे कलम १६३ नुसार दिनांक २० नोव्हेंबर ला रात्री खुलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## हॉटेल जाळण्याची धमकी

छत्रपती संभाजीनगर : आम्हाला येथे दारू का पिऊ देत नाही, असे म्हणत चार ते पाच जणांनी हॉटेलमध्ये गोंधळ घातला. या प्रकरणी पुंडलिकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयूर मुंडे नितीन, राहुल व इतर पाच जण अशी आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी सुरेंद्र गणेश गव्हाणे रा. रेणुका माता कमान सातारा परिसर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार सुरेंद्र गव्हाणे हे शौर्य पाटील वाडा येथे मॅनेजर म्हणून काम करतात. १८ नोव्हेंबर रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास आरोपी हॉटेलमध्ये आले. आम्हाला येथे दारू पिऊ का देत नाही, असे म्हणत गोंधळ घातला. हॉटेलमधील स्टाफला व फिर्यादीला मारहाण केली. तसेच हॉटेल जाळून टाकण्याची धमकी दिली.

## इम्तियाज जलील यांच्यावर गुन्हा


छत्रपती संभाजीनगर : पूर्व मतदार संघातील शिवाजीनगर येथील पंडित जवाहर नेहरू महाविद्यालयातील बुथवर मतदारांना दमदाटी करत गोंधळ घातल्याप्रकरणी पूर्व मतदारसंघ एमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलील यांच्यासह इतर १० ते १२ जणांवर पुंडलिक नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक आनंद बनसोडे यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी सव्वा पाच वाजेच्या सुमारास फिर्यादी पोलीस स्टाफसह पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय येथील सेक्टर नंबर ३ येथे मतदान बंदोबस्तावर होते. बुथ क्र. ९७ च्या खोली क्रमांक २ समोर इम्तियाज जलील हे त्यांच्यासोबत दहा ते बारा जणांना घेऊन आले. बोगस मतदान होत आहे असा आरोप करीत मतदानासाठी तेथे उपस्थित असलेल्या सहा-सात लोकांना मारहाण केली. याप्रकरणी पुंडलिक नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बारा वर्षीय मुलगी बेपत्ता छत्रपती

छत्रपती संभाजीनगर : दुकानात चिप्स आणायला गेलेल्या १२ वर्षीय मुलीचे अज्ञाताने अपहरण केले. नारेगावातील राजेंद्रनगरात गुरुवारी (दि. १४) ही घटना घडली. या प्रकरणी मुलीच्या आईने एमआयडीसी सिडको ठाण्यात अज्ञाताविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. अपहरण झालेल्या मुलीचे वडील खासगी नोकरी करतात. गुरुवारी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास त्यांची मुलगी घराजवळील दुकानात चिप्स आणण्यासाठी गेली. त्यानंतर ती घरी परतलीच नाही. महिलेने दुकानात जाऊन पाहिले असता मुलगी तेथे नव्हती. त्यानंतर ही बाब पतीला सांगितली. त्यांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला मात्र, मुलगी मिळून आली नाही. अखेर एमआयडीसी सिडको ठाण्यात धाव घेत त्यांनी अपहरणाचा गुन्हा नोंद केला.

## सिडको वाळूज महानगरात एकाच रात्री तीन घरे फोडली ; लाखोंचे दागिने लंपास

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : गेल्या काही दिवसांपासून एमआयडीसी वाळूज पोलिस ॲक्शनमोड असून, सतर्क असतानाही पोलिसांच्या नाकावर टिच्चून चोरट्यांनी सिडको वाळूज महानगरातील राजस्वप्नपुर्ती अपार्टमेंट मध्ये एकाच रात्री तिन घरे फोडून सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम लंपास केले आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, नागरिक भयभीत झाले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अनिल चांगदेव मालवदे हे राज स्वप्नपूर्ती मध्ये रो हाऊस नंबर ए २-१३ मध्ये कुटुंबासह राहतात. ते दिनांक १९ नोव्हेंबर रोजी मूळ गावी मतदान करण्यासाठी गेले होते. आज सकाळी ७ वाजेच्या दरम्यान ते परत घरी आले असता त्यांना दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेला दिसला संशय आल्याने घरात जाऊन बघितले असता कपाटामध्ये ठेवलेले ५५ हजार रु. सोन्याचे दागिने ज्यात एक तोळ्याचे मिनी गंठण, ८ ग्राम वजनाचे मिनी मंगळसूत्र, ५ ग्राम सोन्याची ठुशी असा एकूण १ लाख ४७ हजाराचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे कळले. तात्काळ त्यांनी याबाबत सोसायटीमध्ये राहणारे शंतनू चौधरी यांना सांगितली असता त्यांनी चौधरी यांनी सागर देवसिंग जोनवाल यांच्याही घरी चोरी झाल्याचे सांगितले. सागर जोनवाल हे ही दि २० रोजी दुपारी बदनापूर येथे गेले असता त्यांना शेजारी राहणारे सदाशिव लांडगे यांनी चोरी झाल्याचे कळवले. जोनवाल यांनी तत्काळ घरी येऊन घरामध्ये साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले पाहणी केली असता, सोन्याचे १२ ग्राम वजनाच्या दोन अंगठ्या, ६ ग्राम वजनाचे गंठण असा एकूण ८५ हजाराचे दागिने त्यांना चिरट्यांनी चोरून नेल्याचे लक्षात आले. याच सोसायटीमध्ये राहणारे योगेश्वर जाधव हेही घनसावंगी येथे ड्यूटी कामी गेले व त्यांची पत्नी मुळगाव तुर्काबाद खराडी येथे मतदान करण्यासाठी गेले होते. त्यांच्याही घरी चोरी झाल्याचे कालिदास भगरे यांनी सांगितले. त्यांनी तत्काळ घरी पोहचून घरात ठेवलेले ६ ग्राम वजनाची सोन्याची आंगठी १० ग्राम वजनाचे मणी मंगळसूत्र, ३ ग्राम कानातील वेल, असा एकूण ९५ हजार रु किमतीचे दागिने जाधव यांचेही चोरट्यांनी लंपास केले. तिघांचा मिळून एकूण ३ लाख २७ हजार रुपये किमतीचे दागिने चिरट्यांनी लंपास केले.

चोरटे सीसीटीव्हीमध्ये वैद

रात्री अडीच वाजेच्या दरम्यान ५ चोरटे बॅग व तोंडाला रुमाल बांधलेल्या अवस्थेत आल्याचे दिसले. हे सर्व चोरटे सोसायटीमध्ये लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेरात वैद झाले आहे. यात्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहे.

## बजाजनगरातील खदानींवर अतिक्रमण; प्रशासनाचे दुर्लक्ष

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : वाळूज महानगर हा औद्योगिक परिसर आहे. त्यामुळे या परिसरात वाढती लोकसंख्या पाहता मुलभूत गरजा व राहण्यासाठी जागांचा तुटवडा होत असून, याचा गैरफायदा भूमाफिया घेत असून, शासकीय खदानीवर कब्जा करून अधिकार्यांना हाताशी धरून कोट्यवधी रुपयांच्या खदानी हडप केल्या आहेत. सध्या खदानींच्या टोलेजंग इमारती उभ्या आहेत. इतके होऊनही रमेश मोरे चौकातील खदानीवर या भूमाफियांची कुदृष्टी पडली असून, संपूर्ण खदानीमध्ये मुरुम टाकून गिळंकृत करण्यात आली आहे याकडे मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.



बजाजनगरातील रमेश मोरे चौकाच्या बाजूला एक मोठी खदान होती, त्या खदानीवर अनेक मातब्बर नेत्यांनी अतिक्रमण करून त्यावर पक्के बांधकाम केलेले आहे. या खदानीच्या जागेवर आजपर्यंत वाहनांचे शोरुम, बँक, प्रिंटिंग प्रेस, ट्रान्सपोर्ट, रुग्णालय आदी उद्योग उभे आहेत. तर काहींकडे या जागेच्या रजिस्ट्रीही उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले.

खदानींची रजिस्ट्रीद्वारे विक्री

याप्रकरणी अधिक चौकशी केली असता, बर्याच जणांकडे या जागेंच्या रजिस्ट्री असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या खदानींच्या जागेवरील शासकीय जागेची रजिस्ट्री कोणी करून दिली? कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नसताना या खदानींची रजिस्ट्री झाली कशी? हा प्रकार एमआयडीसींच्या लक्षात आला नसेल का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. यामागे भूमाफियांसह एमआयडीसी अधिकारी व रजिस्ट्री विभागातील अधिकारी यांचा 'अर्थ'पूर्ण हात असण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

खदान बुजवून ट्रक पार्किंग

रमेश मोरे चौकालगत असलेल्या एका शोरुमच्या पाठीमागे असलेली खदान मुरुम टाकून बुजविण्याचे काम सुरू असून, अर्ध्यापेक्षा जास्त खदान बुजविण्यात आली आहे. या बुजवण्यात आलेल्या खदानीवर सर्रासपणे ट्रक पार्किंग केल्या जात आहेत.

## पैठण विधानसभेसाठी बिडकीन येथे ७५. टक्के मतदान

तभा वृत्तसेवा बिडकीन दि २१ नोव्हेंबर पैठण विधानसभा मतदारसंघ ११० निवडणुकीसाठी बुधवार रोजी शांततापूर्ण वातावरणात मतदान पार पडले, विशेष म्हणजे शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत असल्याने या लढतीकडे संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे लक्ष लागले आहे, सायंकाळ पर्यंत सरासरी ७५,७१ टक्के मतदान झाले आहे, पैठण तालुक्यातील बिडकीन मधील १५ मतदान केंद्रांवरील १५७५० मतदारां पैकी ११९२५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असुन एकुण ७५.७१ टक्के मतदान झाले आहे.भाग क्रमांक १७ मधील १३३३ पैकी ९७४ , भाग क्रमांक १८ मधील ८९२ पैकी ६६६ ,भाग क्रमांक १९ मधील ५४७ पैकी ३९९ ,भाग क्रमांक २० मधील १३३७ पैकी १०४८ , भाग क्रमांक २१ मधील ११२६ पैकी ८६२ ,भाग क्रमांक २२ मधील १२८१ पैकी ९८० , भाग क्रमांक २३ मधील ११३२ पैकी ८९३ भाग क्रमांक २४ मधील १२९१ पैकी १००७ , भाग क्रमांक २५ मधील १२९७ पैकी १०१६ , भाग क्रमांक २६ मधील १३४५ पैकी ९६८ , भाग क्रमांक २७ मधील १३६४ पैकी ९४७ , भाग क्रमांक २८ मधील ९२२ पैकी ५७५ , भाग क्रमांक २९ मधील ८८९ पैकी ६६५ , भाग क्रमांक ३१ मधील ६४३ पैकी ५१० तर भाग क्रमांक ३२ मधील ५२९ पैकी ४३१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असुन १५७५० पैकी ११९२५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत ७५.७१ टक्के मतदान केले आहे.यावेळी निवडणूक अधिकारी, शिक्षकांना, महसूल विभाग यांनी मतदान प्रक्रिया पार पडली, यावेळी कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरिक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, पोउपनि अशोक माने,पोउपनि मनेश जाधव, स्थानिक गुन्हा शाखेचे एस एस कदम,सह पोलीस कर्मचारी यांनी पोलीस ठाण्याचे हद्दीतील सर्व मतदान केंद्रावर चेक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आले होते



## एमएसएमई कडून देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या महिला इन्क्युबेटीला (उद्यमी) १५ लाख अनुदान मंजूर

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय (चडचए), भारत सरकार, ने देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या महिला इन्क्युबेटीला त्यांच्या इन्क्युबेशन आणि इनोव्हेशन कार्यक्रमांतर्गत १५ लाख अनुदान मंजूर केले आहे. या अनुदानाचा उद्देश महाविद्यालयाच्या इन्क्युबेशन सेंटरमधून उभरत्या स्टार्टअप्सच्या वाढीस मदत करणे आणि त्यांना अधिक प्रगती करण्यासाठी सक्षम बनविणे आहे.

चडचए आयडिया हॅकाथॉनसाठी देशभरातून एकूण १८,८८८ कल्पना सादर झाल्या. यापैकी ६८० कल्पनांची निवड केली गेली आणि प्रकल्प निरीक्षण व सल्लागार समितीने (झच-उ) ३९७ कल्पनांना निधी मिळवण्यासाठी मंजुरी दिली. होस्ट संस्थेच्या रूपात देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाला ११ कल्पना प्राप्त झाल्या, ज्यामध्ये ७ कल्पनांना सादरीकरणासाठी निवडले गेले. यातील २ कल्पनांना निधी मिळवण्यासाठी शिफारस करण्यात आली. या मधून एक कल्पना १५ लाख अनुदान मिळवण्यात यशस्वी ठरली. ही कल्पना 'एअर कुलरमधील वॉटर पंप नियंत्रित करून वीज आणि पाणी वापर कमी करण्यासाठी' संबंधित आहे.

देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाने नेहमीच नवोन्मेष आणि उद्यमशीलतेला प्रोत्साहन दिले आहे. महाविद्यालयाच्या इन्क्युबेशन सेंटरने युवा उद्योजकांना त्यांच्या कल्पनांना व्यवसायात रूपांतरित करण्यासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध केले आहे. चडचए कडून मिळालेल्या या अनुदानामुळे महाविद्यालयाच्या उद्यमशीलतेला मान्यता मिळाली आहे आणि स्टार्टअप इकोसिस्टमला अधिक बळ मिळाले आहे. प्रभारी संचालक डॉ. सुभाष लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली, इन्क्युबीटिंसला योग्य संसाधने, कौशल्यवर्धन आणि व्यवसायाची योग्य दिशा मिळत आहे, ज्यामुळे त्यांना त्यांच्या स्टार्टअप्समध्ये यश मिळवण्यासाठी मदत होणार आहे. डॉ. सचिन अग्रवाल यांनी चडचए ळऊए- हॅकथॉनच्या संबंधित स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेतले आहेत.

चडचए आयडिया हॅकाथॉन कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित करण्या बद्दल, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. श्री. प्रकाशदादा सोळुंके, सचिव मा. आ. श्री. सतीश चव्हाण, उपाध्यक्ष श्री. शेख सलीम शेख अहमद, कोषाध्यक्ष श्री. किरण आवरगावकर, कार्यकारीणी सदस्य श्री. विश्वास येळीकर, श्री. प्रदीप चव्हाण, महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. सुभाष लहाने, विभागप्रमुख डॉ. सत्यवान धोंडगे, डॉ. गजेंद्र गंधे, डॉ. सचिन बोरसे, डॉ. सुगंधा असोदेकर, डॉ. आरती वाढेकर, डॉ. शोएब शेख, डॉ. रुपेश रेब्बा, प्रा. संजय कल्याणकर, श्री. अच्युत भोसले, डॉ. राजेश औटी यांनी सर्वांचे अभिनंदन केले.